रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २२१
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज विशेष कार्यक्रम

**मुंबई** : कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेची गौरवशाली परंपरा जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळातील मध्यवर्ती सभागृहात यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुक्रवारी जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन तसेच वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित लोकसेवेचा लोकजागर या ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषामंत्री उदय सामंत, विधीमंडळ मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे.

अंतरंग

आंबेनळी घाटात महिलेचा जळालेला मृतदेह आढळला/२

रोहा अष्टमी नगरपालिकेचा अर्थसंकल्प सादर/५

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघ बाद फेरीत/८

# मुख्यमंत्र्यांनी मांडला विकासाचा रोडमॅप

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०१२-१३ साली १३ लाख कोटी होती. गेल्या ११ वर्षांत ती ५१ लाख कोटींपर्यंत आली. आम्ही राज्याची अर्थव्यवस्था तिपटीने वाढवली. आता ९० लाख कोटींचा टप्पा गाठायचा आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ज्याने ६६० बिलियनचा टप्पा पार केला आहेत. इतर कुठलेही राज्य अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्याइतके पुढे नाही. त्यामुळे राज्य दिवाळखोरीत निघाल्याचे सांगून विरोधक जनतेची दिशाभूल करीत आहेत, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २६) विधानसभेत केला.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०२१-२२मध्ये देशातील जीडीपीत आपली टक्केवारी १३.१ टक्के, २०२२-२३मध्ये १३.५ टक्के, २०२३-२४मध्ये १३.८ टक्के, तर २०२४-२५मध्ये १४ टक्के इतकी आहे. जीडीपीमध्ये आपला वाटा वाढत आहे. जीडीपीच्या कर्जाच्या सगळे पॅरामिटर्स महाराष्ट्राने पूर्ण केले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे बोलताना म्हटले की, मराठा तितुका मिळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवा हे आपण करतोय, मात्र विरोधकांची कॅसेट गुजरातवरच अडकली आहे. २०२२पासून तेच ते उद्योग बाहेर गेलेत असे विरोधक सांगत आहेत. त्यांनी अभ्यास करून विषय मांडले तर बरे होईल. विरोधक गोबेल्सचे तत्व अवलंबत आहेत, पण हे सरकार



२०२९पर्यंत आहे आणि पुढच्या टर्मलासुद्धा आमचेच सरकार येईल.

दरम्यान, २०३४, २०४७चे विकसित महाराष्ट्राचे डॉक्युमेंट पाहा, प्रत्येक जिल्ह्याचा आराखडा तयार केला आहे. २५ टक्के निधी त्यासाठी डीपीडीसीला द्यावा लागेल. प्रत्यक्ष तो कार्यान्वित करीत आहोत. २०४७पर्यंत पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था करायची आहे. दरवर्षी १० लाख रोजगार निर्मिती करायची आहे. प्रगत तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, वित्तीय शिस्त व शाश्वत विकास या माध्यमातून वित्तीय तूट अडीच टक्क्याखाली आणायची आहे, पर्यायी उत्पन्नाचे स्त्रोत शोधायचे आहेत. एक व्हिजन मॅनेजमेंट युनिट आपण तयार केले आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

### टिपू सुलतान-शिवराय तुलनेवरून विरोधकांना सुनावले

'विरोधी पक्षाचा सूर पाहिल्यावर वाटले ते भ्रमीत आणि संभ्रमित आहे. लोकांना काही मुद्द्यावर संभ्रमित करायचे म्हणून मुद्दे मांडले जात आहेत. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करून मुद्दे मांडले पाहिजेत, जेणेकरून महाराष्ट्राच्या हितात तुमचे योगदान वाढेल. टिपू सुलतान चांगला होता की वाईट याला आक्षेप नाही, ती चर्चा होतच राहिल, परंतु टिपू सुलतान हा छत्रपती शिवाजी महाराजांएवढा मोठा राजा होता, असे कोणी म्हणत असेल, तर त्याला आमचा विरोध आहे. शिवरायांएवढेच टिपूबाबतही चांगले बोलले गेले पाहिजे असे सांगत असेल, तर त्याला आमचा विरोध आहे', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

## राज्यात रस्त्यावरील अपघाती मृत्यूंमध्ये आठ टक्क्यांची घट

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागाने राबविलेल्या सातत्यपूर्ण उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून जानेवारी २०२६मध्ये अपघाती मृत्यूंमध्ये ८.०५ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे.

जानेवारी २०२५मध्ये १,४२७ अपघाती मृत्यू झाले होते, तर जानेवारी २०२६मध्ये ही संख्या १,३१२वर आली आहे. म्हणजेच ११५ मृत्यूंनी घट झाली आहे. त्याचप्रमाणे अपघातांची एकूण संख्या ३,१६४वरून ३,१००वर आली असून त्यात २ टक्क्यांची घट झाली आहे. रस्ता सुरक्षा उपायांमुळे अनेक जिल्ह्यांत मृत्यूदरात लक्षणीय घट झाली आहे.



## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा त्यांच्या पत्नी व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक गुरुवारी (दि. २६) वरळी डोम येथील सभागृहात झाली. यावेळी कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी हात उंचावून पाठिंबा दिला. यानंतर पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्याचे पटेल यांनी जाहीर केले. यावेळी त्यांनी आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला, तर पक्षाच्या अध्यक्ष उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पूर्ण निष्ठा व समर्पण वृत्तीने काम करेन, असा शब्द दिला.

## सीकेटी कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन उत्साहात

### मान्यवरांची लाभली उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील स्वायत्त दर्जाप्राप्त चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन दर्पण गुरुवारी (दि. २६) उत्साहात झाले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून आयकर विभागाचे मुंबई येथील संयुक्त आयकर आयुक्त महेश लोंढे यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त माहितीपट प्रदर्शित करण्यात आला तसेच त्यांच्या जीवनावर महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे डॉ. रत्नप्रभा म्हात्रे संपादित जिज्ञासा या २८व्या लघु अंकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य अ‍ॅड. राहुल घरत आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले व महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेचा आढावा घेतला. प्रमुख पाहुण्यांची ओळख मराठी विभागाच्या प्रा.एन.एच. कडू यांनी करून दिली.

प्रमुख अतिथी महेश लोंढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वेळेचे महत्त्व अधोरेखित केले. मोबाईल, टीव्ही आणि इंटरनेट या साधनांचा संयमाने वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. केवळ जिंकण्यापेक्षा स्पर्धेत सहभाग महत्त्वाचा असून शैक्षणिक अभ्यासाबरोबरच सहअभ्यासक्रम आणि स्पर्धा परीक्षांमध्येही सहभागी होण्याचा सल्ला त्यांनी दिला तसेच उत्तम वाचन, वेळेचा सदुपयोग आणि चांगली संगत हीच आयुष्यातील यशाची गुरुकिल्ली असल्याचे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे, संयमाचे आणि त्यांच्या घवघवीत यशाचे कौतुक केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचेही योगदान मोलाचे असल्याचे सांगत त्यांनी सर्वांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. (पान २ वर..)





**पनवेल** : शीख धर्माचे नववे गुरू तेग बहादूर साहिब यांच्या ३५०व्या शहिदी वर्षानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित होणाऱ्या हिंद-दी-चादर या ऐतिहासिक व प्रेरणादायी उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर खारघर येथे कार्यक्रमाच्या नियोजनाची पाहणी करण्यात आली. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तयारीचा आढावा घेत मार्गदर्शन केले. त्यांचा सन्मान करण्यात आला. पाहणीवेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर नितीन पाटील, नगरसेवक हॅप्पी सिंग यांच्यासह इतर मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रबळगडाच्या दरीत उडी मारून तरुणीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

घरगुती कारणावरुन एका तरुणीने पनवेल तालुक्यातील माची प्रबळगडाच्या खोल दरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाला स्थानिक नागरिकांच्या मदतीने या तरुणीचा मृतदेह दरीतून बाहेर काढला आहे.

पोयंजे बीटच्या पोलीस पथकाने प्रबळगडावर जाऊन तेथील स्थानिकांच्या मदतीने शोधमोहीम राबवली. त्यात त्यांना दरीत महिला पडलेल्या अवस्थेत आढळली. रुग्णवाहिका बोलावून तिला रुग्णालयात आणण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला तपासून मृत घोषित केले. या महिलेचे नाव प्रिती सिंग (रा. कोपरखैरणे, नवी मुंबई) असे असून घरगुती कारणामुळे तिने रागाच्या भरात आत्महत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## पनवेलच्या वलप ग्रामपंचायतीमध्ये तब्बल २६६६ संशयास्पद जन्म प्रमाणपत्रांची नोंद

### भाजप नेते किरीट सोमय्या आक्रमक; सखोल चौकशीची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप नेते, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मालेगावमधील बांगलादेशी नागरिकांच्या मुद्द्यानंतर आता पनवेलमध्येही गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी बुधवारी पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायतीला भेट देत पत्रकारांशी संवाद साधला.



सोमय्या यांच्या म्हणण्यानुसार वलप ग्रामपंचायतीमध्ये तब्बल २६६६ अपात्र जन्म प्रमाणपत्रे नोंदवण्यात आल्याचा संशय आहे. या जन्म प्रमाणपत्रांच्या आधारे काही व्यक्तींची नावे मतदार यादीतही समाविष्ट झाली असावीत, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले तसेच या सर्व प्रकरणाची निवडणूक आयोगामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. (पान २ वर..)



# पाली एसटी बसस्थानकाच्या कामाला गती

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बैठकीत दिले निर्देश

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पाली येथील एसटी बसस्थानकाचे बांधकाम अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. वाढती प्रवासी संख्या आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचे प्रश्न लक्षात घेऊन २५ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली.



या बैठकीत स्थानिक पातळीवरील विविध प्रलंबित समस्यांवर चर्चा होऊन सकारात्मक आणि ठोस निर्णय घेण्यात आले. पाली बस स्थानकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामाला गती देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

या बैठकीस पेण-सुधागड-रोहा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील तसेच अलिबागचे आमदार महेंद्र दळवी उपस्थित होते. या दोन्ही आमदारांनी बैठकीच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या पुढाकारामुळे पाली बस स्थानकाचे काम पूर्णत्वास जाण्याची आशा व्यक्त करण्यात आली.

बैठकीस शिवसेना (शिंदे गट) चे उपजिल्हाप्रमुख कुलकर्णी, युवा जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, जिल्हा समन्वयक राजेंद्र राऊत, विधानसभा संपर्कप्रमुख संदीप दपके, युवानेते सुरज शेळके तसेच भाजपाचे सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे पाली नगरपंचायतचे नगराध्यक्ष पराग मेहता, रोहन दगडे आणि चंद्रकांत (दादा) घोसाळकर यांनीही या बैठकीत उपस्थित होते.


पाली बस स्थानकाचे काम दीर्घकाळ प्रलंबित असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुंबईत झालेल्या या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशांमुळे कामाला गती मिळून लवकरच प्रवाशांना आधुनिक व सुरक्षित सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा पालीच्या नागरिकांकडुन व्यक्त करण्यात येत आहे.

# आंबेनळी घाटात महिलेचा जळालेला मृतदेह आढळला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंबेनळी घाटात पोलादपूर तालुक्याच्या हद्दीत चिरेखिंड गावाच्या घाटरस्त्यालगत अज्ञात महिलेचा जळालेला मृतदेह काँक्रीटच्या भिंतीच्या मोरीच्या पाईपामध्ये असल्याचे या परिसरामध्ये दूर्गंधी पसरल्याने शोध घेता आंबेनळी घाटातील रस्त्याचे काम करणाऱ्या कामगारांना आढळून आले. या घटनेची फिर्याद रस्त्याच्या कामाचा साईट सुपरवायझर अजित नथुनसाहा गुप्ता याने पोलादपूर पोलीसांना दिली.

पोलादपूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी व महिला पोलीसांनी घटनास्थळी परिसराची पाहणी केली असता अज्ञात आरोपीने अज्ञात महिलेला अज्ञात कारणाने जीवे ठार मारून पोलादपूर तालुक्यातील बावळीटोक गावाच्या हद्दीतील काँक्रीटच्या भिंतीमधील मोरीच्या पाईपामध्ये कोणतेतरी अतिज्वलनशील रसायनाने



यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल आणि अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाड उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार असलेल्या श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

मृत महिलेच्या जळलेल्या अवस्थेतील प्रेताच्या पायामध्ये चांदीची पांढऱ्या धातूची जोडवी असून हाताच्या बोटामध्ये पिवळया धातूची रिंग असल्याचे दिसून आले. मृतदेह ताठरता आलेल्या अवस्थेत असल्याने जाळण्यापूर्वीच महिलेचा खुन झाल्याची प्राथमिक शक्यता दिसून आली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, मागील काही दिवसांत रायगड, रत्नागिरी आणि पुणे जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या महिलांच्या तक्रारींचा आढावा घेतला जात आहे. तसेच मोबाईल लोकेशन, स्थानिक माहिती आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांचा कसून तपास सुरू आहे.

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाट, कशेडी घाट तसेच डोंगरदऱ्यांतील भागांमध्ये अशाप्रकारे स्त्री-पुरूषांचे खुन करून मृतदेहांची विल्हेवाट लावण्याचा प्रकार अनेकपर्षांपासून सातत्याने होत असल्याने दिवसरात्र गस्तीपथक तसेच सीसीटिव्ही कार्यरत करण्याची मागणी होत आहे.

## तांबाटी ग्रामपंचायत माझी वसुंधरा अभियानात कोकण विभागात प्रथम



**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानात ग्रुप ग्रामपंचायत तांबटी यांनी उत्कृष्ठ कामगिरी केल्याने कोकण विभागात त्यांचा प्रथम क्रमांक तर राज्यात चौथा क्रमांक आल्याने पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे,गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत तांबटी यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० हा कोकण विभाग स्तरीय प्रथम क्रमांक पुरस्कार पटकावला असून राज्यात चौथा क्रमांक मिळाला आहे.त्यांचे विशेष अभिनंदन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले.रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे.कोकणात प्रथम तर राज्यात चौथा क्रमांक मिळाला आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंच तत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धे अंतर्गत तीन हजार ते पाच हजार लोकसंख्या गटामध्ये तांबटी ग्रामपंचायतीचा विभागात प्रथम क्रमांक आला.

# अन् प्रवाशांसाठी एसटीचा वाहक ठरला देवदूत!

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

सायंकाळी पनवेलहून कर्जतला जाणाऱ्या एस टी बसच्या चालकाला कर्जतच्या अलीकडे नऊ किलोमीटर वर असलेल्या चौकफाट्यावर एसटी बसचालकाला बस चालू असताना चक्कर येत होती. हे समजताच प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. बस बाजूला घेण्यात आली. त्यानंतर एस टी च्या वाहकाने बसचा ताबा घेतला आणि प्रवाशांना सुरक्षित कर्जत पर्यंत आणले. त्यामुळे त्या एसटीमधील प्रवाशांसाठी वाहक देवदूतच ठरला.

पनवेल बसस्थानकाहून कर्जत करिता सायंकाळी साडे सहाच्या सुमारास ( एम एच - २० बी एल - ३६२८ ) एस टी बस निघाली. संध्याकाळची वेळ असल्याने बस खचाखच भरलेली



होती. सव्वा सातच्या सुमारास एस टी बस चौक फाटा आला आणि अचानक आवाज आला 'अहो यांना चक्कर येते.' हे ऐकताच प्रवाशांमध्ये चलबिचल झाली. नक्की कळेना कोणाला चक्कर येते. त्यानंतर अहो, बसच्या चालकांना चक्कर येते अशी माहिती पुढील प्रवाशांनी दिली. त्यामुळे बस मधील प्रवाशांमध्ये घाबराटीचे वातावरण पसरले.

त्यानंतर आवाज आला गाडी बाजूला घ्या. प्रवाशांना काही समजेना नक्की काय झाले. काही क्षण आता काय होणार? काय करायचे? पण प्रसंगावधान दाखवत बसचे वाहक नितीन राजाराम मोरे लगबगीने पुढे आले. त्या बस चालकाला बाजूला बसवले आणि स्वतः बसचा ताबा घेऊन एस टी बस कर्जत पर्यंत अगदी सराईतपणे आणली आणि प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला. त्यामुळे बस मधील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. चक्कर आलेल्या चालकाचे नाव होते संदीप सोनावणे. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. या एस टी बसने प्रवास करणारे सामाजिक कार्यकर्ते विकास चित्ते यांनी हा थरारक अनुभव सांगितला.

# दस्तुरी नाक्यावर आंब्याचे भलेमोठे झाड कोसळले; मोठा अनर्थ टळला

**नेरळ : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान येथील दस्तुरी नाका वाहनतळ परिसरात गुरुवार (दि. २६ फेब्रुवारी) रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास भलेमोठे जीर्ण आंब्याचे झाड अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. झाड थेट रस्त्याच्या मधोमध आडवे पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली; मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी अथवा वाहनांचे नुकसान झाले नाही.

विशेष म्हणजे सध्या शाळांच्या परीक्षा सुरू असल्याने या मार्गावर नेहमीसारखी गर्दी नव्हती. अन्य दिवशी विद्यार्थ्यांची, पालकांची व पर्यटकांची मोठी रेलचेल असते. जर त्या वेळी वाहतूक मोठ्या



प्रमाणात सुरू असती, तर मोठा अनर्थ ओढवला असता, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली.

झाड कोसळताना मोठा आवाज झाल्याने नागरिक सावध झाले. त्यांनी तत्काळ रस्त्यावरून येणारी वाहने थांबवली. परिसरात उभ्या असलेल्या सुमारे सात व्हॅन तसेच काही खाजगी वाहने वेळीच हटवण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.

# दिवाळे शाळेतील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या महानगरपालिका शाळा क्रमांक २, दिवाळे कोळीवाडा येथील विद्यार्थ्यांनी आर्थिक दुर्बल घटक स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

रोवला आहे.



या शाळेतील इयत्ता आठवीतील साईराम अय्यपन पिल्ले, आमित रमेश घनघाव आणि अजिंक्य सिद्धार्थ या तीन विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवत घवघवीत कामगिरी केली आहे. सातत्यपूर्ण अभ्यास आणि वर्ग शिक्षक प्रशांत खांडगे यांचे योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून शाळेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, तर्कशक्तीची आणि शैक्षणिक गुणवत्तेची कसोटी पाहणारी मानली जाते. अशा स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. भविष्यातही अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार शाळेने व्यक्त केला आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापकांचे सक्षम नेतृत्व, शिक्षकांचे परिश्रमपूर्वक मार्गदर्शन तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सातत्याने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा हा सकारात्मक परिणाम असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका सुहासिनी लोंढे यांनी सांगितले.

# खालापुरात हळदीकुंकू समारंभ आणि खेळ पैठणीचा; विजेत्यांना बक्षीस

**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष ढेकू आणि नरेशदादा युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीचे औचित्य साधून महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ तसेच खेळ पैठणीचा कार्यक्रम खालापूर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी हजारो महिला भगिनींनी उपस्थिती दर्शवून प्रतिसाद दिला.



या कार्यक्रमास सिनेअभिनेते क्रांतीनाना मालेगावकर व बाल कलाकार छोटी अभिनेत्री सह्याद्री मालेगावकर यांची उपस्थिती लाभली. यावेळी लकी ड्रॉच्या माध्यमातून कूपन काढण्यात आले होते. यात ढेकू गावातीलच रेश्मा अरुण कुडपाणे या महिलेला स्कुटी गाडी भेट देण्यात आली.

खेळ रंगला पैठणी कार्यक्रमात पूजा मयूर मते (आतकरगाव) यांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस एलईडी टीव्ही व पैठणी, द्वितीय आरती अल्पेश अल्पेश पाटील (चिलठण) बक्षीस शेगडी, तृतीय श्वेता अक्षय पाठारे (आतकरगाव) बक्षीस कुलर, चतुर्थ प्रणिता तेजस बोरले (ठाणेनाव्हे) व पाचवा क्रमांक प्राप्त दामिनी आशिष पोळेकर (कुंभिवली) यांना कुकर बक्षीस देण्यात आले. अनेक महिलांना नाकातील नथ व भेटवस्तू देण्यात आल्या. त्याचबरोबर हळदीकुंकू संभारंभासाठी आलेल्या महिला-भगिनींना हळदीकुंकू वाण साडी भेट देण्यात आली. कार्यक्रमास माजी आमदार सुरेश लाड, उपनगराध्यक्ष विक्रांत साबळे, जिल्हा परिषद सदस्य रेश्मा पाटील, भाजप कामगार आघाडी जिल्हा संयोजक विठ्ठल मोरे, माजी सभापती मनोहर थोरवे, संदीप पाटील, सरपंच प्रकाश पाटील, विनोद खवले, आध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे, अनंता पाटील, खालापूर तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, हरिभाऊ जाधव, सोशल मीडिया प्रमुख दीपक जगताप, सुजाता दळवी, निकिता हेलंडे, श्वेता मनवे, रेश्मा आंग्रे, यशोदा मोरे, निकिता हेलांडे, रोहिणी पाटील, भालचंद्र पाटील, प्रवीण मनवे, राजू पाटील, प्रशांत पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा येथील शेतकऱ्यांना भाजीपाला, फुलशेतीचा आधार

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शेतीमधे भातशेती हा मुख्य व्यवसाय आहे.ही भातशेती मुख्यत्वेकरून पावसावर आधारित केली जाते.मात्र वावेहवेली धरणाच्या पाण्यावर आधारीत भाजीपाला क्षेत्र वाढताना दिसत आहे. तसेच काही ठिकाणी पाणथळ जमिन व दवावर आधारीत भाजीपाला व कडधान्याचे पिक काढले जाते.ही शेती करत असताना तालुक्यात गेल्या दोन तीन वर्षांपासून शेतीमध्ये पालेभाजी व फुलशेतीचे प्रयोग करून पालेभाजी , कडधान्य व फुलशेती केली जात आहे.याला चांगला यश येत असल्याचे पहावयास मिळत असून त्यामध्ये चांगला अर्थिक लाभ होत आहे. त्यामुळे भाजीपाला व फुलशेती कडे शेतकरी वळत आहेत.



तालुक्यात बोरघरहवेली,गिरणे ,पढवण,पिटसई,शेनाटे,वानस्ते इत्यादी ठिकाणी भाजीपाला , कडधान्य व फुलशेती शेतकरीवर्ग करत आहेत.तळा तालुक्यातील बोरघरहवेली गावातील प्रयोगशील शेतकरी दामोदर चव्हाण यांनी अंदाजे दोन एकर क्षेत्रावर वाल,घेवडा व वांगा,माठ ,पालक , कोथींबीर,कोबी,मिरची ,टोमॅटो,भेंडी,इत्यादी विविध पिकांची लागवड केली असून चांगले पिक येण्यास सुरुवात झाली आहे, त्यातून चांगला आर्थिक लाभ होत आहे. तसेच काही शेतकरी फुलांच्या रोपांची लागवड करून ती शेती यशस्वीपणे करून चांगले अर्थिक उत्पन्न मिळवत आहेत.

शेतकरी दामोदर चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की मी एक वेगळ्या प्रकाराने भाजीपाला शेती करताना त्या जी पिके कोकणात येत नाहीत असेही प्रयोग करून शेती करत आहे.ही लागवड केली या लागवड केल्यानंतर योग्य प्रकारे कृषी अधिकारी व स्वदेसच्या मार्गदर्शनाखाली शेती चांगल्या प्रकारे आली चांगले रोपाने पिक देऊन चांगले उत्पन्न मिळाले आहे,

पान १ वरुन

## सीकेटी कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन उत्साहात

महाविद्यालयातील क्रीडा, कला, संशोधन, सेवा क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी विभागीय, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर देदीप्यमान यश प्राप्त केले अशा विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयीन स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयातील शैक्षणिक पात्रता वृद्धिंगत करणारे प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनासुद्धा सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.आर. व्ही. येवले, प्रा.ए.व्ही. पाटील आणि प्रा.डॉ. गीतिका तंवर यांनी केले.

दुसऱ्या सत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नृत्य, गायन आणि अभिनय यांचा कला संगम असणारा दर्पण २०२६ या शीर्षकाखालील वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या दिमाखात साजरे झाले. यासाठी प्रमुख अतिथी हिंदी बिगबॉस फेम प्रसिद्ध अभिनेता प्रणीत मोरे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्याचबरोबर प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख डॉ.बी.एस. पाटील, वाणिज्यशाखेचे प्रमुख डॉ.एस.बी. यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ.जे.एस. ठाकूर, आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ.बी. डी. आघाव, कार्यालयीन अधीक्षक पी.एस. म्हात्रे, महिला विकास विभागाच्या प्रमुख डॉ.आर.डी. म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक गणेश जगताप, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर आणि विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक डॉ.एस. एन. परकाळे व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## पनवेलच्या वलप ग्रामपंचायतीमध्ये तब्बल २६६६ संशयास्पद जन्म

### प्रमाणपत्रांची नोंद

पनवेल पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना या संदर्भात तपासाचे आदेश देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. मंगळवारी मालेगाव येथे आणि त्यानंतर बुधवारी पनवेलमधील वलप येथे केलेल्या आरोपांमुळे राज्यात पुन्हा एकदा नागरिकत्व, जन्म नोंदणी आणि मतदार यादीतील नावे या मुद्द्यांवर चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत ग्रामपंचायत प्रशासन किंवा संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. पुढील काही दिवसांत या प्रकरणात कोणत्या घडामोडी घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, खैरणे ग्रामपंचायतीचे सरपंच शैलेश माळी, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ खुटारकर, राजेश पाटील, तळोजा मंडळ सरचिटणीस अंकुश पाटील, जेष्ठ नेते प्रभाकर पाटील, युवा नेते संजोग पाटील, परेश पाटील, सागर सांगडे, जगन्नाथ पाटील आदी उपस्थित होते.

## माझी वसुंधरा अभियानामध्ये पोलादपूर बीडीओ दिप्ती गाट तृतीय

**पोलादपूर : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा ५.० अभियानांतर्गत पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांना कोकण विभागात उत्कृष्ट गटविकास अधिकारी म्हणून तिसरा क्रमांक प्राप्त केला. याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी युनियन पोलादपूरतर्फे दिप्ती गाट यांचा बॅ.नाथ पै सभागृहामध्ये सत्कार करण्यात आला.

प्रसंगी सहाय्यक गट विकास अधिकारी काणेकर, कृषी अधिकारी साळी, विस्तार अधिकारी पंचायत हंबीर, विस्तार अधिकारी कृषी धिवरे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मयूर बर्वे, आदेश तुडीलकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

माझी वसुंधरा ५.० अभियानामध्ये कोकण विभागात उत्कृष्ट गटविकास अधिकारी म्हणून तृतीय क्रमांक संपादन केल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी युनियन पोलादपूर यांच्यावतीने जिल्हाध्यक्ष अनिल पवार, तालुकाध्यक्ष उमेश मनवे, सचिव किशोर गोपाळघरे, महिला उपाध्यक्ष मेघना भोसले, शिल्पा कोंढाळकर, वर्षा पवार, त्रिशीला गंभीरे, स्नेहल धोत्रे, श्रीमती हटकर व सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांचे उपस्थितीत गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांचा सत्कार करण्यात आला.

## दुखवटा

### सुनंदा पवार



**अलिबाग :** जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. संतोष पवार यांच्या मातोश्री ,प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचाचे अध्यक्ष सखाराम पवार यांच्या पत्नी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका सुनंदा सखाराम पवार यांचे बुधवारी(दि.२५) सकाळी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या ८९ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, मुलगी, सुना, जावई नातवंडे , पंतवंडे असा परिवार आहे. रामनाथ येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दशक्रीया विधी आणि उत्तरकार्य शुक्रवारी (दि.६) होणार आहे.

## निवडक

### खारघरमध्ये पाच लाखांची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून पाच लाख रुपये चोरून नेल्या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. वर्षा तांबे या सेक्टर १६, खारघर येथे राहत असून त्या वॉकिंग साठी गेल्या. घरात दोघेजण असल्याने त्यांनी दरवाजा उघडा ठेवला. पावणेआठ वाजता त्या वॉकिंग करून घरी परत आल्या. यावेळी घरातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी कपाटात ठेवलेली रोख रक्कम चेक केली. यावेळी पाच लाख रुपये दिसून आले नाहीत. अनोळखी व्यक्तीने ते चोरून नेले.

### वावंजेतून तरुणीचे अपहरण

**पनवेल :** सतरा वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात २५ फेब्रुवारी रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रसिका पवार ह्या कोंडप, वावंजे येथे राहत असून २४ फेब्रुवारी रोजी त्यांची १७ वर्षीय मुलगी घराच्या बाहेर मंडपामध्ये गेली होती. थोड्यावेळाने तिला जेवायला बोलावण्याकरता त्या गेल्या असता मंडपामध्ये त्या दिसून आले नाहीत. तिचा परिसरात शोध घेतला मात्र ती सापडली नाही. अनोळखी व्यक्तीने तिला पळवून नेले. ती अंगाने मध्यम, रंग गहूर्णीय, उंची पाच फूट तीन इंच आहे आणि कपाळावर टिकली, गोंदन केलेली आहे. अंगात गुलाबी पंजाबी ड्रेस आणि पायामध्ये उंच सँडल घातलेली आहे.

### अपघातानंतर मारहाण व शिवीगाळ

**पनवेल :** अपघात केल्याच्या कारणावरून शिवीगाळ आणि



लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व एकाने डोक्यावर दगड मारून जखमी केल्याप्रकरणी तिघां विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २२ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गितेश पानमंद हे कळंबोली सेक्टर एक येथे राहत असून ते देवेंद्र सोबत रिक्षाने डबा घेण्यासाठी जात होते. यावेळी गावदेवी मंदिराजवळ आगरी समाज मंदिराशेजारी, सेक्टर १४, कामोठे येथे मोटरसायकलने रिक्षाला धडक दिली यात मोटरसायकल चालक खाली पडला. यावेळी चौकशी करत असताना दोन ते तीन व्यक्ती त्यांच्याजवळ आले आणि गितेश आणि देवेंद्रला शिवीगाळ केली व मारहाण केली. त्यातील एकाने डोक्यावर दगड मारला आणि बाबू उर्फ रवींद्र पाल यांनी गीते यांच्या गालावर चावा घेतला आणि तिघेही तिथून पळून गेले.

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## कामोठे पोलीस ठाण्यात सासू, नणंद आणि दिरांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पतीच्या निधनानंतर मालमत्तेच्या वादातून आणि सासरच्या मंडळींकडून होणार्‍या सततच्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून एका ३८ वर्षीय विवाहितेने टोकाचे पाऊल उचलत आपली जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पुष्पा सतीश शिरोळे असे मृत महिलेचे नाव असून, तीने गत १६ फेब्रुवारी रोजी कुलाबा येथे समुद्रात उडी टाकून आत्महत्या केली होती. कामोठे पोलिसांनी या प्रकरणी सासू, नणंद आणि दोन दिरांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन पुढील तपासाला सुरुवात केली आहे.




या घटनेतील मृत पुष्पा शिरोळे यांचा विवाह २०१४ मध्ये सतीश शिरोळे यांच्याशी झाला होता. पती सतीश यांचे जून २०२३ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पतीच्या निधनानंतर पुष्पा या आपल्या दोन लहान मुलांसह कामोठे येथील फ्लॅटमध्ये राहत होत्या. पतीच्या निधनानंतर मिळणारे लाभ, विम्याचे पैसे आणि कामोठे येथील घराच्या मालकी हक्कावरुन सासरच्या मंडळींनी त्यांच्याकडे तगादा लावला होता.

पुष्पा यांच्या सासू कोंडाबाई शिरोळे, नणंद प्रतिभा शिरोळे, दीर संदीप शिरोळे आणि विनायक शिरोळे हे वारंवार पैशांची मागणी करत होते. मुंबईतील ताडदेव आणि लोअर परेल येथे स्वत:ची दुकाने आणि मालमत्ता असूनही, ही मंडळी पुष्पा यांच्याकडे असलेल्या कामोठे येथील फ्लॅटमध्ये हिस्सा मागत होती. या वादातून त्यांना सतत शिवीगाळ, मारहाण आणि मानसिक त्रास दिला जात होता. या त्रासाबाबत त्यांनी यापूर्वी ऑगस्ट २०२३ मध्ये कामोठे पोलिस ठाण्यात तक्रारही दाखल केली होती.

१६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी पुष्पा यांनी राहत्या इमारतीच्या टेरेसची चावी मिळवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अयशस्वी ठरला. त्यानंतर त्यांनी आपल्या लहान मुलीला, मी आता कधीच घरी येणार नाही, असे सांगून घर सोडले. त्या बेपत्ता झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती. त्यानंतर दुसर्‍या दिवशी त्यांचा मृतदेह कुलाबा परिसरातील समुद्रात मिळून आला होता. पुष्पा यांनी सासरकडील मंडळींच्या जाचाला कंटाळून समुद्रात उडी मारून आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मृत पुष्पा यांचे भाऊ गणेश हाडवळे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध बीएनएस कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे), ३५१(१), ३५२, ८५ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन लहान मुलांच्या डोक्यावरुन पित्यानंतर आता मातेचेही छत्र हरवल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## पावणे चार लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

कंपनीचे एमडी असल्याचे भासून तीन लाख ८० हजार रुपये किमतीची अ‍ॅपल कंपनीचे कुपन अ‍ॅमेझॉन वरून ऑनलाईन खरेदी करण्यास सांगून ती व्हाट्सअप वर पाठवण्यास सांगितले आणि तीन लाख ८० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

चैतन्य सागर भोकरे हे लोढा पलावा, खोणी डोंबिवली येथे राहत असून त्यांना व्हॉट्सअ‍ॅप नंबर वरून मेसेज आला आणि त्या डीपीवर त्यांच्या कंपनीचे एमडी व्होरा यांचा फोटो होता. यावेळी समोरून ते परदेशात असून कस्टमरला एप्पल कंपनीचे कुपन गिफ्ट करायचे आहेत असे सांगून ती कुपन ऑनलाईन पद्धतीने अ‍ॅमेझॉनवरून खरेदी करून व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठवण्यास सांगितले. त्यानुसार भोकरे यांनी तिकिटे ऑनलाईन खरेदी केली आणि त्यांच्या व्हॉट्सअ‍ॅपनंबर वर पाठवली.

दुसर्‍या दिवशी ऋषभ व्होरा यांच्या मोबाईलवर संपर्क करून पाठवलेले कूपन मिळाले की नाही याबाबत विचारणा केली. यावेळी त्यांनी अशी कोणतीही कुपन मागितली नसल्याचे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ‘हिंद-दी-चादर’च्या व्यवस्थेची पनवेल, नवी मुंबई महापालिका आयुक्तांकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागम कार्यक्रमाला खारघर ओवे मैदान से.२९ येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत होत असलेल्या या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी कार्यक्रमासाठीजे आयोजन आहे. त्याची प्रत्यक्ष पाहणी पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी व नवी मुंबई मनपा आयुक्त कैलास शिंदे यांनी नुकतीच केली.

यावेळी नूतन नगरसेवक हॅपी सिंग तसेच पनवेल महानगरपालिकेचे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, पनवेल महानगरपालिकेचे मुख्य



वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी तसेच इतर विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य व्यासपीठ पाहणी करण्यात आली. तसेच पिण्याच्या पाण्याची, लंगर व्यवस्था, अन्नधान्य व साहित्य भांडार व्यवस्था, बैठक व्यवस्था, वाहन पार्कींग व्यवस्था, हेलीपॅड व्यवस्था, शौचालय व्यवस्था अशा विविध व्यवस्थांची पाहणी करून अधिक सुविधा उत्तम रीतीने मेळाव्यात यासाठी संबंधितांना सूचना केल्या. त्यासोबतच वैद्यकीय व्यवस्थेची पाहणी करतांना त्याठिकाणी आयसीयू, कार्डिअेक म्ब्युलेंस, प्रथमोपचार व औषध व्यवस्था याबाबत विशेष दक्षता घेण्याचे सूचित करण्यात आले.

वातावरणातील बदल लक्षात घेऊनपिण्याचे पाणी, ओआरएस, ज्यूस आदींची जास्तीत जास्त व्यवस्था करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. परिसर स्वच्छता व शौचालय स्वच्छता सुव्यवस्थीत राहण्याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.

## पनवेलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रखर राष्ट्रभक्त आणि महान क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांनी सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या त्याग आणि राष्ट्रसेवेच्या महान कार्याला आदरांजली वाहिली. या कार्यक्रमावेळी सावरकरांच्या विचारांचे आणि त्यांच्या अतुलनीय देशसेवेचे स्मरण करण्यात आले.





यावेळी जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक सुमित झुंझारराव, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रुचिता लोंढे, अभिषेक पटवर्धन, तन्मय समेळ, संजय कदम, रूपेश नागवेकर, रोहित जगताप, केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढीचे वरिष्ठ व्यवस्थापक महेंद्र गोडबोले, सुषमा भिडे, विनिता जोशी आदींनी सावरकरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील रोजगारासाठी पनवेल मनपाचा पुढाकार

## तरुणांना कौशल्य विकासाच्या प्रशिक्षणाची संधी

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल परिसरातील युवक-युवतींसाठी निर्माण होणार्‍या रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन पनवेल महापालिकेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. विमानतळ तसेच विमानतळाशी सलग्न उद्योगांमध्ये स्थानिक तरुणांना नोकरी मिळावी, यासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण मोफत देण्याच्या उद्देशाने महापालिकेने प्रशिक्षण व रोजगार देणार्‍या संस्थांसाठी स्वारस्य निविदा जाहीर केली आहे.

विशेष म्हणजे महापालिका क्षेत्रात राहणार्‍या तरूणांना रोजगारासाठी कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देणारी पनवेल ही पहिली महापालिका असेल. महापालिकेने सूमारे तीन हजार उमेदवारांना विविध कौशल्य कुशलतेचे प्रशिक्षणासाठी ७ ते ८ कोटी रूपये खर्च करण्याची तयारी दर्शविली आहे.

आयुक्तांनी विमानतळाचे संचलन करणार्‍या अदानी उद्योग समूहाच्या प्रतिनिधींशी चर्चा करून विमानतळात उपलब्ध होणार्‍या रोजगारांची माहिती घेतली. या चर्चेनंतर विमानतळ व सलग्न उद्योगांमध्ये तब्बल १४ प्रकारच्या कामांसाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार या कामांसाठी आवश्यक अद्ययावत कौशल्य प्रशिक्षण देणार्‍या संस्थांची निवड करण्यासाठी बुधवारी स्वारस्य निविदा जाहीर करण्यात आली आहे. महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या अखत्यारीत असणार्‍या समाज विकास विभागामार्फत बुधवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेनुसार, पनवेल महापालिका क्षेत्रातील स्थानिक युवक-युवतींना विमानतळाशी संबंधित मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या स्वारस्य निविदेत इच्छुक संस्था २५ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत त्यांची नोंदणी करू शकतील. सध्या प्रशासकीय राजवट संपून लोकप्रतिनिधींच्या हाती कारभार आल्याने महापालिकेचे महापौर नितीन पाटील व नगरसेवकांनी या योजनेची युवकांमध्ये प्रभावी जनजागृती करणे आवश्यक ठरणार आहे.

योग्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना विमानतळातील रोजगाराच्या संधी मिळाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमात बारावीपासून पदविका आणि इतर शैक्षणिक पात्र उमेदवारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण महापालिका देण्याचे नियोजन आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होत आहे.

> **मागील वर्षी भव्य रोजगार मेळाव्यातील उमेदवारांच्या प्रतिसादानंतर महापालिका क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ असावे यासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणार्‍या संस्थांकडून स्वारस्य निविदा मागविल्या आहेत.**
>
> **-मंगेश चितळे, आयुक्त,** पनवेल महापालिका

## सीकेटी कॉलेजमध्ये ‘निर्मिती’ प्रदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील अंतर्गत रचना (INTERIOR DESIGN) विभागातर्फे आयोजित निर्मिती प्रदर्शन NIRMITEE Exhibition २०२५-२०२६ या वार्षिक प्रदर्शन सोहळा दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात दिमाखात झाला.

या वर्षीच्या प्रदर्शनाची संकल्पना Fusion - A Blend of Traditional and Contemporary Art अशी होती. विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणार्‍या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या प्रदर्शनासाठी इन्फ्रा-आर्च आर्किटेक्ट्सचे संस्थापक आर्किटेक्ट वैभव नलावडे तसेच डिओसिटी फर्मचे डायरेक्टर आर्किटेक्ट जय माळी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

जे.बी.एस.पी. संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे मनःपूर्वक कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, विज्ञान शाखेच्या प्रमुख प्रा. डॉ. जे. एस. ठाकूर आणि इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शवत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

डिप्लोमा विभागाच्या समन्वयक प्रज्योती देसाई यांनी इंटिरियर डिझाईन विभाग व निर्मिती २०२५-२०२६ प्रदर्शनाबाबत प्रमुख पाहुण्यांना सविस्तर माहिती दिली. बी.एस्सी. विभागाच्या समन्वयक स्वेच्छा गोसावी यांनी समारोपपर भाषणात कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमासाठी इंटिरियर डिझाईन विभागातील शिक्षक विनया गावंड, प्रांजली पंचगडे, मनीषा पाटील, समीरा शेख आणि संध्या सिंह यांचे विशेष योगदान लाभले. अशी वैशिष्ट्यपूर्ण संधी विभागाला उपलब्ध करून दिल्याबद्दल जे.बी.एस.पी. संस्थेचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे आभार मानले.



**मुंबई : भाजयुमोच्या प्रदेशाध्यक्षपदी कृष्णराज महाडिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल पनवेलमधील युवा पदाधिकार्‍यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा वॉरियर उत्तर रायगड जिल्हा संयोजक देवांशू प्रबाळे, युवा मोर्चा विधानसभा संयोजक रोहित जगताप, युवा नेता अक्षय सिंग, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सचिव नितेश घुगे, पनवेल प्रभाग १९चे अध्यक्ष अनिमेश पटवर्धन, जयेश चव्हाण आदी उपस्थित होते.**



**पनवेल : तालुक्यातील नेरे येथील श्री विठ्ठल-रखुमाई मंदिर उत्सवनिमित्त भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, सोमनाथ चौधरी आदींनी भेट देत दर्शन घेतले.**

## महिलांसाठी खास धुळवड उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

महिलांना एकत्र आणत उत्साहात होळी साजरी करण्यासाठी क्रांतीज्योती महिला विकास फाउंडेशन तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही महिलांसाठी खास धुळवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मंगळवार ३ मार्च २०२६ रोजी फाउंडेशनच्या कार्यालयात, सेक्टर १६, नवीन पनवेल, पिल्लई कॉलेजजवळ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी फक्त महिलांनाच प्रवेश दिला जाणार असून महिला स्पेशल धुळवड म्हणून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. कार्यक्रमात डीजे म्युझिक, विविध मनोरंजनात्मक उपक्रम (फन ॲक्टिव्हिटीज) तसेच स्वादिष्ट नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली आहे. होळीचा आनंद सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात महिलांनी मनमुराद लुटावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमासाठी विशेष Holi Spacial Group तसेच WhartApp ग्रुपची सोय करण्यात आली आहे, जेणेकरून अधिकाधिक महिलांनी यात सहभागी व्हावे. या उपक्रमाच्या आयोजक रुपालीताई शिंदे (अध्यक्ष, क्रांतीज्योती महिला विकास फाउंडेशन), तसेच ‘आपला सत्यवार्ता’ आणि ‘पनवेल न्यूज चॅनल’च्या संपादिका म्हणून कार्यरत आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क ८६५२४१४३४३ महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धुळवडीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# प्रतिष्ठा जपायला हवी

न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा जपणे हे लोकशाहीच्या जपणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा पवित्र स्तंभ आहे. न्याय मिळण्यास वेळ लागत असला तरी आजही लोक मोठ्या आशेने व अपेक्षेने न्यायासाठी न्यायालयांकडे पाहतात. त्यामुळे न्यायव्यवस्थेची प्रतिमा मलीन होऊ नये याची काळजी घ्यायलाच हवी. न्यायव्यवस्थेतील त्रुटींवर सुयोग्य व जबाबदार मंचावर विचार केला जाऊ शकतो. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसमोर या विषयाची चर्चा करण्यातून काय साध्य होणार हा प्रश्न रास्तच म्हणावा लागेल.

**नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग अर्थात एनसीईआरटीने प्रकाशित केलेल्या इयत्ता आठवीच्या सामाजिकशास्त्राच्या नव्या पाठ्यपुस्तकात ‘समाजातील न्यायपालिकेची भूमिका’ या धड्यात यंदा प्रथमच ‘न्यायपालिकेतील भ्रष्टाचार’ या विषयाचा समावेश करण्यात आला होता. सरन्यायाधीशांनी या धड्यातील संबंधित मजकुराबद्दल बुधवारी तीव्र नाराजी व्यक्त केली तर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी या पुस्तकाच्या निर्मिती व वितरणावर बंदी आणली. या वादग्रस्त धड्याबद्दल केंद्रसरकारनेही दिलगिरी व्यक्त केली असून त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या मुद्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली असे सांगण्यात आले. न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा पवित्र स्तंभ आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेची प्रतिमा मलीन होऊ नये याची काळजी परोपरीने घ्यायलाच हवी. या व्यवस्थेत ज्या काही त्रुटी असतील त्यांची चर्चा ही सुयोग्य, जबाबदार मंचावर केली जाऊ शकते. पण अवघ्या आठव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांसमोर न्यायव्यवस्थेची अशी नकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यातून काय साधले जाणार? सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना आपण न्यायपालिकेबाबत काय सांगू पाहतो आहोत असा प्रश्न या धड्यासंदर्भात अनेक स्तरांवर उपस्थित करण्यात आला. दरम्यान, संबंधित धड्यात असा भाग समाविष्ट करायला नको होता याबाबत शिक्षण मंत्रालयाने सहमती दर्शवली असून वादग्रस्त पुस्तकाचे वितरण थांबवण्याचे आदेशही दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या शैक्षणिक कौन्सिलच्या प्रमुखांवर न्यायालयाच्या अवमानाबद्दल कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. आठवीच्या पुस्तकातील या धड्यात न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांबद्दल माहिती देण्यात आली होती व त्याअंतर्गत न्यायपालिकेतील भ्रष्टाचार आणि प्रलंबित खटल्यांबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. यापूर्वीच्या पाठ्यपुस्तकात न्यायपालिकेची रचना व तिची भूमिका यांचे वर्णन होते. मात्र भ्रष्टाचाराचा उल्लेख नव्हता. काही ज्येष्ठ वकिलांनी बुधवारी सरन्यायाधीशांसमोर हा मुद्दा मांडला, तेव्हा सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी या मजकुरावर तीव्र नाराजी व्यक्त केली. कोणालाही न्यायपालिकेची बदनामी करू देणार नाही असे स्पष्ट केले. या मजकुरामुळे बार आणि बेन्च तसेच न्यायप्रणालीतील अनेक घटक अस्वस्थ असल्याचे सांगत सरन्यायाधीशांनी आपण या प्रकरणाची स्वत:हून दखल घेत आहोत असे सांगितले. त्यानंतर बुधवारी रात्रीच एनसीईआरटीने माफी मागत आपल्या संकेतस्थळावरून संबंधित पुस्तक हटवले. खटल्यांचे प्रलंबित राहणे ही आपल्याकडे नेहमी उल्लेखली जाणारी बाब आहे. ‘तारीख पे तारीख’ हे वास्तव बदलण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे याबद्दल कुणाचेच दुमत असणार नाही. न्यायालयांवरील खटल्यांचा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत. आव्हानांबद्दल सुयोग्य मंचावर चर्चा करून विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. न्यायपालिकेसारख्या लोकशाहीच्या पवित्र स्तंभाबद्दल संभ्रमाचे वातावरण निर्माण करणे टाळायला हवे.**

# मराठी तितुका मेळवावा..!

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी. धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी, आमुच्या मनामनात दंगते मराठी , आमुच्या रगारगात रंगते मराठी आमुच्या उराउरात स्पंदते मराठी, असे आपण अभिमानाने म्हणतो . दरवर्षी २७ फेब्रुवारीला जगभरातील मराठी भाषकांकडून मराठी दिन साजरा करतो. राज्यात नुकताच मराठी पंधरवडा पाळण्यातआला .त्यानिमित्त विविध स्पर्धा , कार्यक्रम घेतले .विश्व मराठी संमेलन-२०२६ आयोजित करण्यात आले होते. पण अशा स्पर्धा , कार्यक्रम व संमेलन घेऊन न मराठी भाषेचे संवर्धन होईल का ? हा खरा प्रश्न आहे




मराठी भाषेचे. वय हे साधारणपणे १५०० शे वर्ष मानले ज़ाते. या काळात समाज जीवनातल्या बदलानुसार ही भाषा बदलत राहिली असे मानले ज़ाते. मराठी ही एक समृद्ध भाषा आहे. ’अमृतासही पैजा जिंके’ अशा शब्दांत ज्ञानेश्वरांनी या भाषेचं कौतुक केलं होतं. जसा काळ बदलतो तसे भाषेमध्येही बदल होतात. बोली भाषादेखील तितक्याच समृद्ध आहेत. त्याची लाज वाटण्यासारखं काहीच नाही. उलट बोली भाषेमुळे आपण विशिष्ट प्रांतांची ओळख मोठी करतोय असं त्याच्याकडे पाहून त्याचा संवर्धन करणं आवश्यक आहे. मराठी भाषेचा उदय संस्कृतचा प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषे पासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीचा यादवांचा काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपी मधुन लिहिली ज़ाते. इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी लीळा चरित्र लिहिले. त्यानंतर इ.स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली.महानुभाव संप्रदायाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथ यांनी या भाषेत भारुडे लिहिली आणि एकनाथी भागवत, भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली.

आपण दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरावडा १४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान साजरा करतो. मराठी भाषेला वैभव मिळवून देणाऱ्या संतांचा आणि समाजसुधारकांचा मोठा वारसा असलेले महाराष्ट्रातील लोक खरेच भाग्यवान असल्याचे सांगितले जाते

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात ज्ञान आकलन मातृभाषेतून होणे, ही एक महत्त्वाची बाब आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा तर आहे. जर्मन, चीन यासारखे देश मातृभाषेचा आग्रह धरीत, त्यांच्या भाषेचा अभिमान बाळगीत त्यांच्या देशातील तज्ञ घडवतात. आपल्याकडेही तसे होणे आवश्यक आहे. जगात सर्वत्र मराठी लोक दिसतात परंतु आपले अधिराज्य नाही. यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. याविषयी स्वतः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरण आखले असून आता या नव्या शैक्षणिक धोरणानुसार कोणतेही शिक्षण हे मातृभाषेतूनच देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मराठी मातीत वैश्विकता आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेला धर्म म्हणजेच महाराष्ट्र धर्म. पसायदानाच्या माध्यमातून सर्वांच्या कल्याणाचा विचार त्यांनी मांडला. हा वैश्विक कल्याणाचा विचार हाच आपला खरा महाराष्ट्र आणि यासोबतच आपली मराठी भाषा आणि संस्कृतीही जोडली गेली आहे. मराठी भाषा सनातनी आहे, शाश्वत आहे. अलीकडेच सुरू झालेल्या मराठी भाषा विद्यापीठाशी मराठी भाषा विषयाशी संबंधित काम करणाऱ्या जगभरातील सर्व संस्थांनी जोडले जावे, मराठी भाषा जगातील एक समृद्ध भाषा आहे. या भाषेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या भाषेकडे पूर्वजांचा हजारो वर्षांचा विचारांचा ठेवा आहे आणि हा ठेवा पुढच्या पिढीला देणे, ही काळाची गरज आहे. इंग्रजी व्यवहार भाषा असली तरी आपण आपल्या मुलांशी मात्र मराठीतच बोलायला हवे. प्रमाण भाषा महत्वाची तर आहेच परंतु याचबरोबर बोली भाषेचा गोडवाही जपायला हवा.

भगवद्गीतेत म्हटले आहे की, कोणतीही महान व्यक्ती कोणतेही काम करत असली तरी सामान्य लोक त्यांचे अनुकरण करतात. तो जे काही मानक ठरवतो, संपूर्ण जग त्याचे पालन करते. इंग्रजी ही उच्चभ्रू वर्गाची भाषा आहे, असा खोटा समज समाजातील सुशिक्षित आणि प्रभावशाली लोकांनी पसरविला आहे. आधुनिक शिक्षण वगैरे घेण्यासाठी इंग्रजी ही अनिवार्य भाषा आहे. गेल्या काही वर्षांत अनेकांनी मराठी, हिंदी, तेलुगू, तामिळ, कन्नड माध्यमांच्या शाळांमधून आपली मुले काढून घेतली आहेत.सध्याच्या काळात आंतरराष्ट्रीय शाळांचे युग आले आहे . शिक्षक पालकांना घरातही मुलांशी इंग्रजीत बोलण्यास सांगू लागले.त्यामुळे भाषिक विभागणी झाली आहे. एक वर्ग आहे जो इंग्रजी बोलू शकतो, आणि दुसरा वर्ग आहे जो इंग्रजी बोलू शकत नाही.इंग्रजी भाषेमुळे झालेल्या या ध्रुवीकरणाचा प्रादेशिक भाषांच्या अभ्यासावर परिणाम झाला आहे. आज आपल्या अनेक मुलांना मराठी, हिंदी आणि इतर भाषा लिहिता-वाचता येत नाहीत.

सन १८०६ मध्ये, ईस्ट इंडिया कंपनीने भारतात सेवेसाठी नागरी सेवकांना पाठवण्यासाठी लंडनजवळ ईस्ट इंडिया कॉलेजची स्थापना केली. त्या दिवसांत कॉलेजने इतर विषयांसह हिंदुस्थानी, फारसी, बंगाली, तेलुगू आणि मराठी भाषा आपल्या अधिकाऱ्यांना शिकवायला सुरुवात केली. त्या काळात, भारत सरकारच्या सेवेत असलेल्या इंग्रजांना भारतीय भाषांचा अभ्यास करण्यासाठी वार्षिक अनुदान दिले जात असे. गंमत म्हणजे आज भारतातील भारतीय भाषा शिकण्यास प्रोत्साहन देण्याची वेळ आली आहे.मराठी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या २० भाषांपैकी एक आहे. तरुणांमध्ये मराठी लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मराठी भाषेतील विविध बोलींतील साहित्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

आज आपण आपल्या भाषेचा म्हणजेच आपल्या मायबोलीचा त्याग करून इंग्रजी भाषेचा अवलंब करीत आहोत. इंग्रजी ही काळाची गरज आहे, याबद्दल दुमत नाहीच परंतु, त्यासाठी आपण मराठीची कास सोडावी, हे मनाला पटणारे नाही. आज आपण आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षणासाठी पाठवतो, मध्यंतरी मराठी भाषा कशी अवघड आहे आणि काना, मात्रा, उकार आणि वेलांटीने आम्ही कसे हैराण झालो आहोत, अशा आशयाचे विद्यार्थ्यांचे व्हिडीओ व्हॉट्स अपवर व्हायरल करण्यात आले होते. मुलांना मराठीचे ज्ञान योग्य देण्याऐवजी आपण ते व्हिडीओ एकमेकांना पाठवून मजा घेतो.

अशा प्रकारे मराठी भाषा संवर्धन होणार नाही तरुण मुलांना इंग्रजीसोबत मराठी भाषेचे ज्ञान द्या, मुलांना मराठी शाळेत पाठवा, जर इंग्रजी शाळेत गेला तर आपल्या विद्यार्थ्याची दुसरी भाषा मराठी असावी हा कटाक्ष तुम्ही तुमचा ठेवा. तुमच्या मुलांना महाराष्ट्राचा इतिहास, मराठीचा इतिहास, आपल्या भाषेतील साहित्य वाचायला प्रवृत्त करा, हे करताना तुम्ही ते पहिले करीत आहात का, हे पहा. लहान मुले आपलेच अनुकरण करीत आहात म्हणून पहिले स्वतः करा नंतर दुस-यांमध्ये बदल घडवायला जा. म्हणूनच सुरुवात स्वतःच्या घरातून करा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बदल एका रात्रीत घडणार नाही म्हणून आपले प्रयत्न सुरूच ठेवा. जय मराठी, जय महाराष्ट्र!

**-नितीन देशमुख, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

### मोबाईलमधील कॅशे फाइल्स क्लिअर करण्याच्या सोप्या टिप्स



अॅण्ड्रॉइड मोबाईलमधील कॅशे फाइल क्लिअर केल्याने मोबाइल हँग होण्याचं प्रमाण कमी होतं, स्टोरेज स्पेस फ्री होऊ शकते आणि विविध अॅप्स वापरताना येत असलेल्या अडचणी दूर होऊ शकतात. त्यामुळे मोबाइलमधील कॅशे फाइल क्लिअर करण्यासाठी तुम्ही खालील काही सोप्या टिप्स फॉलो करू शकता.

मोबाईलमधील स्पेस फ्री करण्याचा हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. प्रत्येक अॅप टेम्परररी डेटा स्टोर करून ठेवतो, जेणेकरून लोडिंग टाइम स्पीड अप होईल. त्यालाच कॅशे असे म्हणतात. प्रत्येक अॅप स्टोर करत असलेला कॅशे करप्ट होऊ शकतो, ज्यामुळे मोबाइल नीट काम करेनासा होता. त्यामुळे कॅशे क्लिअर करण्यासाठी खालील टिप्स फॉलो करा.

* सेटिंग्जमध्ये जा : अॅप ड्रॉवर किंवा होम स्क्रीनवर ‘सेटिंग्ज’ आयकॉन शोधा आणि त्यावर क्लिक करा.

* अॅप्स नेव्हिगेट करा : खाली स्क्रोल करा आणि ‘अॅप्स’ किंवा ‘अॅप्लिकेशन्स’ सेक्शन शोधा.

* एक अॅप सिलेक्ट करा : तुम्हाला इन्स्टॉल केलेल्या अॅप्सची एक लिस्ट दिसेल. तुम्हाला ज्या अॅपचा कॅशे क्लिअर करायचा आहे त्यावर टॅप करा.

* स्टोरेजवर जा : अॅपच्या माहितीमध्ये ‘स्टोरेज’ किंवा ‘स्टोरेज अँड कॅशे’ ऑप्शन शोधा आणि त्यावर टॅप करा.

* कॅशे क्लिअर करा : यात तुम्हाला दोन बटणं दिसतील, एक म्हणजे ‘स्टोरेज क्लिअर’ आणि दुसरं ‘कॅशे क्लिअर’. यातील ‘कॅशे क्लिअर बटणावर टॅप करा. सेव्ह केलेल्या सेटिंग्ज आणि लॉगिन माहितीसह सर्व अॅप डेटा हटवायचा नसेल तर ‘क्लियर स्टोरेज’ वर टॅप करू नका.

स्टोरेज कमी करण्यासाठी वापरा ही दुसरी ट्रिक

सर्वप्रथम मोबाईलच्या सेटिंगमध्ये जा. यानंतर ‘स्टोरेज’ ऑप्शनवर क्लिक करा. आता फाइल कॅटगरीमधील लिस्टवर जा आणि किती स्पेश आहे तपासा. आता ‘फ्री अप स्पेप’ ऑप्शनवर क्लिक करा. या ठिकाणी तुम्हाला Google Files app अथवा Remove Items पर्याय निवडा लागेल. यात तुम्हाला फोटो अथवा व्हिडिओ डिलीट करण्याचा पर्याय मिळतो, जो बॅकअपसाठी घेतला जातो. यातून तुम्ही उपयोगी नसलेल्या फाइल्स अथवा अप्सलादेखील डिलीट करू शकता.

# कवी, लेखक, नाटककार कुसुमाग्रज



## निमित्त

विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी ‘कुसुमाग्रज’ या टोपण नावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे महत्त्वाचे लेखक मानले जातात.

शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन अथवा मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. मराठी अभिरूचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्य आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व स्तरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. शोधक व चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करायला आणि माणसाच्या समग्रतेचे आकलन करायला प्रवृत्त केले. त्यांचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे. कुसुमाग्रजांच्या कविता तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आहेत.

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे बदलले गेले. कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती. एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणून कुसुमचे अग्रज म्हणून ‘कुसुमाग्रज’ असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासून शिरवाडकर हे कवी कुसुमाग्रज या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथील हं.प्रा.ठा. कला महाविद्यालयातून त्यांनी आपले बीए पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बीएची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी, अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३०मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रज यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासून झाली आहे. १९३३ साली त्यांनी ध्रुव मंडळाची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमध्ये सहभाग घेतला. पुढील काळातही त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.

पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपून ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले. केवळ कवी असलेले शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### केस अचानक गळताहेत, अलोपेशिया असू शकतो

तुम्ही कधी अशा व्यक्तीला पाहिले आहे का, ज्याच्या डोक्यावर किंवा दाढीवर गोल ठिपके आहेत? म्हणजे एकाच ठिकाणाहून अचानक सर्व केस गळून पडले आहेत. हे ’अलोपेशिया एरियाटा’ असू शकते.नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थनुसार, जगभरात सुमारे २% लोक आयुष्यात कधीतरी अलोपेशियाने प्रभावित होतात. एकट्या अमेरिकेतच सुमारे ६८ लाख लोक या स्थितीचा सामना करत आहेत. अलोपेशिया ही एक अशी स्थिती आहे, ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारशक्ती चुकून स्वतःच्याच केसांच्या मुळांवर हल्ला करू लागते. अलोपेशियामध्ये केसांची मुळे कायमस्वरूपी नष्ट होत नाहीत, तर तात्पुरती निष्क्रिय होतात. त्यामुळे योग्य वेळी निदान आणि उपचाराने केस पुन्हा वाढण्याची शक्यता असते.



सामान्य टक्कल पडणे हार्मोन आणि आनुवंशिक कारणांमुळे हळूहळू होते. यात केस पातळ होत जातात आणि हेअरलाइन मागे सरकते. तर, एलोपेशियामध्ये केस अचानक गळतात आणि त्या ठिकाणी गोलाकार पॅच तयार होतात. सामान्य टक्कल पडण्यात केसांची मुळे (हेअर फॉलिकल्स) कायमस्वरूपी कमकुवत होतात, तर एलोपेशियामध्ये मूळ जिवंत राहते. हेच कारण आहे की एलोपेशियामध्ये केस पुन्हा वाढू शकतात. दोन्ही स्थितींची कारणे, स्वरूप आणि उपचार एकमेकांपेक्षा वेगळे आहेत.

लोपेशियाचे मुख्य कारण रोगप्रतिकारशक्तीचे असंतुलन आहे. यामागे आनुवंशिक कारणे, ताणतणाव, व्हायरल इन्फेक्शन, हार्मोनल बदल आणि इतर ऑटोइम्यून आजार जबाबदार असू शकतात.

मानसिक ताण रोगप्रतिकारशक्तीवर परिणाम करतो, ज्यामुळे लोपेशिया ट्रिगर होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये, व्हिटॅमिन-डी, लोह किंवा इतर पोषक तत्वांची कमतरता देखील कारण असू शकते. काही सौम्य प्रकरणांमध्ये एलोपेशिया आपोआप बरा होऊ शकतो, विशेषतः जेव्हा लहान पॅच असतात. रोगप्रतिकारशक्ती संतुलित झाल्यावर केस पुन्हा वाढू शकतात.तथापि, उपचार न घेतल्यास रोग वाढू शकतो आणि नवीन पॅच तयार होऊ शकतात. त्यामुळे अशा कोणत्याही स्थितीत डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या. योग्य वेळी उपचार केल्याने केस गळण्याची गती कमी करता येते.

# रोहा अष्टमी नगर परिषदेचा अर्थसंकल्प सादर, पाणीपट्टीत वाढ

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेचे २०२६-२७चा गुरुवारी (दि. २६) अर्थसंकल्प सादर करण्यात आला असून या अर्थसंकल्पामध्ये काही ठिकाणी कर वाढवण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी कर कमी करण्यात आले.

रोहा अष्टमी नगरपरिषद सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी खा.सुनील तटकरे, ना.आदिती तटकरे व मा.आ.अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहाचा विकास सुरू आहे या अर्थसंकल्पात शिक्षण व आरोग्य या बाबींकडे विशेष लक्ष देण्यात आले असून रोहाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे शेडगे यांनी सांगितले.

नागरिकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न असलेल्या पाणीपट्टीच्या दरात वाढ करण्यात आले असून पूर्वी १८०० एका नळ जोडणी ला कर होते तर आता ते वाढ करून २८०० करण्यात आले आहे. तर दुसरीकडे शवदाहीनीचे दर रोहा शहरातील नागरिकांनीसाठी कमी करण्यात आले असून पूर्वी १५०० होते ते आता कमी करून ५०० करण्यात आले आहे. यावेळी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, महेश कोलाटकर, रवींद्र चाळके, निता हजारे आदी उपस्थित होते.

अर्थसंकल्पात कर व दर पत्रकामध्ये बदल करण्यात आले आहेत नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना रोहा शहरातील १४१ दिव्यांग लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रक्कम रुपये ७००० इतके अनुदान देण्यात आले आहे.

---

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२ अंक १२ मंगळवार, फेब्रुवारी २४, २०२६/फाल्गुन ५, शके १९४७ पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १७-**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक ३, पनवेल यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/कात-३/ओवे/कलम १९/२०२६/१६९. याअर्थी, समुचत शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचिंत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे.) यांच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २६ डिसेंबर २०२४ अन्वये कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूचना-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतिच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी भूसंपादन मेट्रो सेंटर क्रमांक ३ पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)**

**मौजे ओवे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| अनुक्रमांक (१) | सव्व्हे नंबर, गट नंबर/हिस्सा नं. (२) | संपादित क्षेत्र (हे.आर.) (३) |
|---|---|---|
| १ | ३४६/१३८ | ०.००.२२ |
| २ | ३४६/१४१ | ०.००.०७ |
| ३ | ३४६/१४२ | ०.०१.९५ |
| ४ | ३४६/१४३ | ०-०१-८० |
| ५ | ३४६/१४४ | ०-०४-०० |
| ६ | ३४६/१४५ | ०-०३-०० |
| ७ | ३४६/१४६ | ०-०७-०५ |
| ८ | ३४६/१४७ | ०-०७-०५ |
| ९ | ३४६/१४८ | ०-०५-५० |
| १० | ३४६/१४९ | ०-११-०० |
| ११ | ३४६/१५० | ०-१४-०० |
| १२ | ३४६/१५१ | ०-०२-०० |
| १३ | ३४६/१५२ | ०-०२-०० |
| १४ | ३४६/१५३ | ०-०३-९५ |
| १५ | ३४६/ १५४ | ०-०६-५० |
| १६ | ३४६/१५५ | ०-०१-९० |
| १७ | ३४६/१५६ | ०-०१-१० |
| १८ | ३८०/६ क | ०-०२-३६ |
| १९ | ३८०/६ ड | ०-०२-६२ |
| २० | ३८१/१३४ | ०-०१-१० |
| २१ | ३८१/१३५ | ०-००-६० |
| २२ | ३८१/१३६. | ०-०२-१० |
| २३ | ३८१/१३७ | ०-०१-९५ |
| २४ | ३८१/१४० | १-३६-९० |
| २५ | ३८१/१४०अ | |
| २६ | ३८२/१/१ | ०-३५-८६ |
| २७ | ३८२/१/२ | |
| २८ | ३८२/१/३ | |
| २९ | ३८२/१/४ | |
| ३० | ३८२/१/५ | |
| ३१ | ३८२/१/६ | |
| ३२ | ३८२/१/७ | |
| ३३ | ३८२/१/८ | |
| ३४ | ३८२/१/९ | |
| ३५ | ३८२/१/१० | |
| ३६ | ३८२/१/११ | |
| ३७ | ३८२/१/१२ | |
| ३८ | ३८२/१/१३ | |
| ३९ | ३८२/१/१४ | |
| ४० | ३८२/२ब | |
| ४१ | ३८२/३/१ | |
| ४२ | ३८२/३/२ | |
| ४३ | ३८२/३/३ | |
| ४४ | ३८२/३/४ | |
| ४५ | ३८२/३/५ | |
| ४६ | ३८२/३/६ | |
| ४७ | ३८२/३/७ | |
| ४८ | ३८२/४ अ | |
| ४९ | ३८२/४ ब | |
| ५० | ३८२/४ क | |
| ५१ | ३८२/६/१ | |
| ५२ | ३८२/६/२ | |
| ५३ | ३८२/६/३ | |
| ५४ | ३८२/६/४ | |
| ५५ | ३८२/६/८ | |
| ५६ | ३८२/७ | |
| ५७ | ३८२/६/५ | ०-०३-०० |
| ५८ | ३८२/६/६ | ०-०१-०० |
| ५९ | ३८२/६/७ | ०-०२-९० |
| ६० | ३८३/१ | ०-०४-०० |
| ६१ | ३८३/३ | ०-२८-८५ |
| ६३ | ३८३/१/३ | ०-०७-०० |
| ६४ | ३८३/४ | ०-०५-०० |
| ६५ | ३८३/५ | ०-०५-०० |
| ६६ | ३८३/७ | ०-०१-०० |
| ६७ | ३८३/८ | ०-०३-०० |
| ६८ | ३८३/९ | ०-०२-०० |
| ६९ | ३८३/१० | ०-०६-०० |
| ७० | ३८३/११ | ००-०१-४० |
| ७१ | ३८३/१२ | ०-०६-०० |
| ७२ | ३८३/१३ | ०-०२-०० |
| ७३ | ३८३/१४ | ०-०६-०० |
| ७४ | ३८३/१५ | ०-०१-०० |
| ७५ | ३८३/१६ | ०-०१-०० |
| ७६ | ३८३/१७ | ०-०५-०० |
| ७७ | ३८३/१८ | ०-०७-०० |
| ७८ | ३८३/१९ | ०-०७-००. |
| ७९ | ३८३/२० | ०-१३-०० |
| ८० | ३८३/२१ | ०-०६-०० |
| ८१ | ३८३/२२ | ०-०६-०० |
| ८२ | ३८३/२३ | ०-०६-०० |
| ८३ | ३८३/२४ | ०-०७-०० |
| ८४ | ३८३/२५ | ०-०७-०० |
| ८५ | ३८३/२६ | ०-१२-०० |
| ८६ | ३८३/२७ | ०-११-०० |
| ८७ | ३८३/२८ | ०-११-०० |
| ८८ | ३८३/२९ | ०-०५-०० |
| ८९ | ३८३/३० | ०-११-०० |
| ९० | ३८३/३१ | ०-०५-०० |
| ९१ | ३८३/३२ | ०-१२-०० |
| ९२ | ३८३/३३ | ०-००-७५ |
| ९३ | ३८३/३४ | ०-०५-०० |
| ९४ | ३८३/३५ | ०-०६-०० |
| ९५ | ३८३/३६ | ०-०६-०० |
| ९६ | ३८३/३७ | ०-०७-०० |
| ९७ | ३८३/३८ | ०-०६-०० |
| ९८ | ३८३/३९ | ०-०१-५८ |
| ९९ | ३८३/४१ | ०-००-५० |
| १०० | ३८३/४६ | ०-०३-०० |
| १०१ | ३८३/४७ | ०-०७-०० |
| १०२ | ३८३/४८ | ०-०७-०० |
| १०३ | ३८३/४९ | ०-०७-०० |
| १०४ | ३८३/५० | ०-०८-०० |
| १०५ | ३८३/५१ | ०-०१-७३ |
| १०६ | ३८३/५२ | ०-०४-२५ |
| १०७ | ३८३/५३ | ०-००-०३ |
| १०८ | ३८३/५४ | ०-०१-२७ |
| १०९ | ३८३/५५ | ०-०३-२२ |
| ११० | ३८३/५६ | ०-०५-२८ |
| १११ | ३८३/५७ | ०-०३-०० |
| ११२ | ३८३/५८ | ०-०९-०० |
| ११३ | ३८३/६१ | ०-०६-३६ |
| ११४ | ३८३/६२ | ०-०१-७५ |
| ११५ | ३८३/६४ | ०-०१-०० |
| ११६ | ३८३/६६ | ०-००-२५ |
| ११७ | ३८३/६७ | ०-०१-६१ |
| ११८ | ३८३/६८ | ०-०५-०० |
| ११९ | ३८३/४० | ०-३१-७७ |
| १२० | ३८३/४२ | |
| १२१ | ३८३/४३ | |
| १२२ | ३८३/४४ | |
| १२३ | ३८३/४५ | |
| १२४ | ३८३/५९ | |
| १२५ | ३८३/६० | |
| १२६ | ३८३/६३ | |
| १२७ | ३८३/६५ | |
| १२८ | ३८३/६९ | |
| १२९ | ३८३/७० | |
| | **एकूण क्षेत्र** | **०६-१४-०८** |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :- पनवेल तालुक्यातील मौजे ओवे, क्षेत्र ०६-१४-०८ हे. आर. खारघर तुर्भे भुयारी जोडरस्त्याचे बांधकाम करणेकरिता भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- पनवेल तालुक्यातील मौजे ओवे, क्षेत्र ०६-१४-०८ है. आर. खारघर तुर्भे भुयारी जोडरस्त्याचे बांधकाम करणेकरिता भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे.

समाजाला मिळणारे लाभ :- करांच्या माध्यातून राज्य सरकारच्या महसुलाची निर्मिती, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि सामाजिक आर्थिक विकास साध्य करणे,

**अनुसूची-तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : निरंक

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार-अ, दिनांक १२ जून २०२५ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितात्सव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

**पनवेल,**
**दिनांक १६ फेब्रुवारी २०२६,**

**सही/-**
**श्रीकांत गायकवाड,**
**प्र. उप जिल्हाधिकारी भूसंपादन,**
**मेट्रो सेंटर क्र. ३, पनवेल**

**जिमाका/राअ/जाहि/३९१/२०२५-२०२६**

## निवडक

### ५४१ रिक्षाचालकांवर कारवाई

**नवी मुंबई :** वाहतुकीचे नियम पायदळी तुडविणाऱ्या रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांनी जोरदार कारवाईचा चाप लावला आहे. विशेष मोहिमेंतर्गत शनिवारी शहरभर धडक तपासणी मोहीम राबवून ५४१ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत संबंधित चालकांकडून ८० हजार ४५० रुपयांचा दंड वसूल केला. रिक्षाचालकांकडून वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली होताना दिसत आहे. मर्जीतल्या मार्गावरचे भाडे नाकारण्याचे ही प्रकार घडत आहेत. अशा रिक्षाचालकांवर कारवाई करून दंड ठोठावण्यात आला.

### आज मराठी भाषा गौरव दिन

**पनवेल :** जागतिक मराठी भाषा दिनानिमित्ताने महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल व कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या या समारंभास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लोककवी प्रशांत मोरे हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे तर प्रमुख उपस्थिती कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांची असणार आहे.

# रसायनीत साडेसहा लाखांचे अमली पदार्थ जप्त

## पंजाबमधील दोन जण पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल, रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा पर्दाफाश करत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने पुन्हा एकदा आपल्या कार्यतत्परतेचा ठसा उमटवला आहे. अत्यंत शिताफीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने केलेल्या कारवाईमुळे अफू सदृश्य अमली पदार्थासारखा प्रकार उघडकीस आला असून या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



२४ फेब्रुवारी रोजी खालापूर तालुक्यातील कैरे गावच्या हद्दीत सावरोली-पाताळगंगा रोडवरील पातळगंगा औद्योगिक क्षेत्रात असलेल्या बॉम्बे डाईंग कंपनीसमोर अशोक लेलँड कंपनीच्या ट्रक (पीबी-१०-ईएच-७५९७)मध्ये अफु सदृश्य (अमली पदार्थ) पावडर असल्याची खात्रीलायक माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना प्राप्त झाली होती.

या अचूक माहितीनंतर त्यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांना सदर घटनेची माहिती दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील सहाय्यक फौजदार संदीप पाटील पोलीस हवालदार सुधीर मोरे, रवी मुंडे, शरद फरांदे, रणजीत खराडे, प्रदीप खरात यांच्या पथकाने सदर ठिकाणी तत्काळ सापळा रचून वाहनाची कसून तपासणी केली असता तपासणीदरम्यान प्लास्टिक गोण्यांमध्ये अफू सदृश्य पावडर आढळून आली.

पोलिसांनी पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला असून या कारवाईत प्रेमसिंग हरदमसिंग (वय ६४) व जैनरल जयराम सिंग (वय ७२) दोघे राहणार पंजाब यांना ताब्यात घेतले आहे.ही धडाकेबाज कारवाई करत पोलिसांनी सुमारे ४२.७३५ किलो अफु सदृश्य पावडर जप्त केली असून तिचे अंदाजे किंमत सहा लाख ४१ हजार ०२६ रुपये इतकी आहे तर गुन्ह्यात वापरलेला आठ लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड कंपनीचा ट्रकचा वापरही करण्यात आला आहे, असा एकूण १४,४१,०२६ रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या संपूर्ण कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, पोलीस हवालदार सुधीर मोरे, रवि मुंडे, शरद फरांदे, रणजीतसिंह खराडे, प्रदीप खरात यांनी अत्यंत महत्वाची आणि निर्णायक भूमिका बजावली. त्यांच्या सतर्कतेमुळे व कुशल तपास कौशल्यामुळेच हा प्रकार प्रकाशझोतात आला. माहिती संकलन, तांत्रिक तपास आणि संशयितांवर बारकाईने नजर ठेवत त्यांनी संपूर्ण प्रकरणाची उकल करण्यात मोलाचा वाटा उचलला.

ही धडाकेबाज कारवाई रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अचूक नियोजनामुळे आणि सातत्यपूर्ण देखरेखीमुळे पथकाला यश संपादन करता आले. दरम्यान, घटनेचा पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर, सहाय्यक फौजदार लालासाहेब कोळेकर, पोलीस हवालदार नितीन शेडगे, श्री.कोकाटे, सुशांत पिंगळे, गिरीश नगरकर यांच्या पथकाकडून तपासाची चक्रे फिरवली आहेत.

सर्व तपास पथकाने समन्वय राखत सदर प्रकाराची सखोल चौकशी सुरू ठेवली आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले सभागृहासाठी महापौरांना निवेदन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या नावाने भव्य सभागृह उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या वतीने या संदर्भात पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या आणि शिक्षण प्रसारासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या नावाने पनवेल शहरात अद्याप कोणतेही अधिकृत सभागृह किंवा स्मारक भवन उभारण्यात आलेले नाही. सामाजिक न्याय, स्त्री सक्षमीकरण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांचे कार्य ऐतिहासिक आणि प्रेरणादायी आहे. त्यामुळे महानगरपालिकेने नियमानुसार योग्य भूखंड निश्चित करून महासभेत ठराव मंजूर करावा व त्यांच्या नावाने भव्य सभागृह उभारण्याची प्रशासकीय प्रक्रिया तत्काळ सुरू करावी, अशी ठोस मागणी शिष्टमंडळाने केली आहे.

यावेळी अध्यक्ष रुपाली शिंदे, स्नेहा धुमाळ, प्रिया गंगावणे, ज्योती तातरे, सुषमा मयेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रवासादरम्यान सोनाराचे सव्वा कोटींचे सोने चोरले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातून उघडकीस आलेल्या एका धक्कादायक घटनेत कराड ते खारघर असा प्रवास करणाऱ्या एका सोनाराचे तब्बल एक कोटी १४ लाख रुपयांचे सोने चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. खासगी ट्रॅव्हल्सच्या बसमधून प्रवास करत असताना ही चोरी झाल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मुंबईतील भायखळा येथील श्री नाकोडा हाईट्स या इमारतीमध्ये राहणाऱ्या ६४ वर्षीय सराफ व्यावसायिकाने याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ही घटना २० फेब्रुवारी रोजी पहाटे घडली. तक्रारीनुसार, संबंधित सराफ सातारा जिल्ह्यातील कराड येथून दुर्गाम्बा ट्रॅव्हल्सच्या खासगी बसने प्रवास करत होते. २० फेब्रुवारीच्या रात्री सुमारे अडीच वाजता त्यांनी बसमध्ये प्रवेश केला.

प्रवासादरम्यान खारघर येथील बसथांब्याजवळ बस पोहचल्यानंतर सराफांना आपली बॅग जवळ नसल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ बसमध्ये बॅग ठेवलेल्या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात शोधाशोध केली, मात्र बॅग सापडली नाही. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, चोरीस गेलेल्या बॅगमध्ये ६०० ग्रॅम वजनाच्या ८० टक्के शुद्ध सोन्याच्या लगडी, १४.५०० ग्रॅम, ३३८.८२० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगडी तसेच ६० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण एक कोटी १४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल होता. या प्रकरणाचा तपास खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

बस कोणकोणत्या ठिकाणी थांबली, त्या वेळी कोणते प्रवासी उतरले, याची सविस्तर माहिती घेतली जात आहे. यापूर्वीही कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत खासगी बसमधून प्रवाशांच्या बॅग चोरीच्या अनेक घटना घडल्या. काही काळानंतर पोलिसांनी चोरट्याला व त्याच्या सहकाऱ्यांना पकडले, मात्र पुन्हा अशा गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. या घटनेमुळे खासगी ट्रॅव्हल्समधील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे.

## मालमत्ता कर वसुलीत ग्राहकांना अभय योजना लागू करावी -निशांत भगत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्ता कराच्या व्याजाच्या शास्ती दराची अंमलबजावणी करणेस व थकीत मालमत्ता कराच्या महसूली उत्पन्नाच्या वसुली करीता कर धारकांसाठी अभय योजना लागू करण्याची मागणी नगरसेवक निशांत भगत यांनी नवी मुंबई आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांना मनपा मुख्यालयात गुरूवार २६ फेब्रुवारी रोजी एका पत्रकाद्वारे केली आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या झालेल्या महासभेत नवी मुंबईतील विविध निवासी घटकांतील नागरिकांनी गरजेपोटी केलेल्या निवासी बांधकामांवरील मालमत्ता करांवरील असलेल्या २००टक्के कर वाढ व्याज दराची शास्ती केवळ पाच टक्के करण्याचा निर्णय महासभेने सर्वानुमते घेऊन तसा ठराव पास केला आहे, त्या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले होते. त्यानुसार मालमत्ता कर देयके संबंधित मालमत्ता कर ग्राहकांना देण्याबाबतीत कार्यवाही करण्याबाबत सूचना महापौर सुजाता पाटील यांनी प्रशासनास करावी या मुख्य मागणीचे पत्र नगरसेवक निशांत भगत यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ कैलाश शिंदे यांना निवेदनाद्वारे दिले आहे. सदरहू मागणीपत्राची प्रत उपमहापौर दशरथ भगत आणि उपायुक्त (मालमत्ता कर) डॉ. अमोल पालवे यांस देखील देण्यात आलेली आहे.

वरील मागणीस अनुसरून मालमत्ता कर विभागामार्फत थकीत असलेल्या सर्वच प्रकारातील मालमत्ता धारकांच्या रक्कमेंचा भरणा होऊन महापालिकेस महसूल प्राप्त व्हावा या हेतुने विशिष्ट कालावधी साठी प्रोत्साहनात्मक अभय योजना देखील सूरू करावी, असे केल्यास मालमत्ता कर ग्राहक तत्परतेने कर भरणा करतील आणि परिणामी नवी मुंबई महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल असेही निशांत भगत यांनी निवेदनात म्हटले आहे.

## उरणच्या इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात औषधांचा तुटवडा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात आजही अत्याधुनिक व सुसज्ज असे एकही हॉस्पिटल नसल्याने जनतेला आजही विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. एकीकडे उरण तालुक्यात अत्याधुनिक सेवा सुविधा सह एकही सुसज्ज हॉस्पिटल नाही. तर दुसरीकडे इंदिरा गांधी शासकीय रुग्णालय हे समस्यांच्या गर्तेत सापडले आहे. त्यामुळे उरणच्या नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सेवा सुविधा मिळत नसल्याने उरणच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

उरण शहरात महिन्याला ३५० पेक्षा अधिक श्वानदंश होण्याच्या घटना घडत आहेत, मात्र त्यासाठी लागणारे 'अँटी रेबीज' औषधांचा साठा अपुरा असल्याने आठवड्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातून उरणच्या इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयमध्ये ही औषधे मागवावी लागत आहेत. श्वानदंश झाल्यानंतर तात्काळ या औषधाची आवश्यकता असून या अतिमहत्त्वाच्या औषधांचा नियमित व पुरेसा पुरवठा करण्याची मागणी उरणच्या, जनतेकडुन नागरिकांकडून केली जात आहे.

**काही दिवसांपासून 'अँटी रेबीज' औषधांचा साठा पुरेसा नव्हता. त्यासाठी जिल्हा रुग्णालयाकडून ही औषधे मागविण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णांना वेळेत औषधपुरवठा केला जात आहे. श्वानदंशाची संख्या वाढल्याने व्यवस्थेवर ताण आहे. रुग्णांना वेळेत औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

**-डॉ. बाबासाहेब काळेल,**
अधीक्षक, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण

## लिमये कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा

**कळंबोली : बातमीदार**

शिक्षणमहर्षि दादासाहेब लिमये आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजमध्ये इतिहास अभ्यास मंडळामार्फत स्थानिक इतिहास लेखन या संकल्पनेवर एक दिवसीय विद्यार्थी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस इतिहास विषयाचे टीवायबीए, एमए-१ व एमए-२चे सर्व विद्यार्थी तसेच इतिहास अभ्यास मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सत्र १ मध्ये अभिषेक ठाकूर यांनी संशोधन पेपर कसा बनवावा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधन विषय निवड, संशोधन प्रश्न मांडणी, प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर, संदर्भ लेखन पद्धती आणि संशोधन पेपरची रचना याबाबत सविस्तर माहिती दिली. सत्र २ मध्ये प्रा. डॉ. जाधव बी. बी. यांनी प्रकल्प लेखन कसे करावे या विषयावर मार्गदर्शन केले. प्रकल्प लेखनाची रूपरेषा, माहिती संकलन, विश्लेषण, निष्कर्ष मांडणी तसेच शैक्षणिक शिस्त याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सत्र ३ मध्ये डॉ. शिंदे एस. बी. यांनी संशोधनात प्राथमिक साधनांचे महत्त्व या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी अभिलेख, दप्तर, पत्रव्यवहार, शिलालेख, मौखिक इतिहास इत्यादी प्राथमिक साधनांचे संशोधनातील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाची सुरुवात गावडे सारिका यांनी प्रास्ताविकातून केली. त्यांनी कार्यशाळेच्या उद्दिष्टांविषयी माहिती देत स्थानिक इतिहास लेखनाचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट केले. कार्यशाळेमध्ये संशोधन पेपर व प्रकल्प लेखन कसे करावे याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर आणि उपयुक्त माहिती देण्यात आली. उपस्थित विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेत शंका निरसन केले.

सूत्रसंचालन उसाटकर मानसी यांनी केले, तर आभार प्रदर्शन वायफळे सृष्टि व पाटील वैष्णवी यांनी केले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला चालना देणारी ठरली असून स्थानिक इतिहास लेखनाविषयी जागरूकता निर्माण करण्यात यशस्वी ठरली.

## मोठी जुईत खेळ पैठणीचा सन्मान भगिनींचा कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था आणि या संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या सौजन्यातून आणि डोलकर माघी गणेशोत्सव मित्र मंडळ मोठी जुई यांच्या वतीने खेळ पैठणीचा सन्मान भगिनींचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



आपल्या रोजच्या कामकाजी जीवनात दहा अंगाने काम करणाऱ्या महिला भगिनींना रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडासा विरंगुळा आणि आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा व त्यातूनच आपली एक वेगळी ओळख निर्माण व्हावी म्हणून उरण तालुक्यातील मोठी जुई गावातील महिला भगिनींकरिता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

डोलकर माघी गणेशोत्सव मंडळ मोठीजुई ह्या मंडळाच्या आयोजनातून आणि राजू मुंबईकर यांच्या सौजन्यातून साकारलेल्या या कार्यक्रमाकरिता मोठी जुई गावातील महिला-भगिनींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला होता. खेळ पैठणीचा सन्मान भगिनींचा या रंगतदार अश्या कार्यक्रमात प्रथम क्रमांकाची मानकरी राणी परेश पाटील, द्वितीय कविता कल्पेश पाटील, तर तृतीय शर्मिला जगदीश कोळी यांनी पटकावला.

राजू मुंबईकर यांच्या सौजन्यातून आणि डोलकर माघी गणेशोत्सव मंडळ मोठीजुई यांच्या आयोजनातून साकारलेल्या हा कार्यक्रम म्हणजे केवळ मनोरंजनात्मक आणि परंपरेचा भागच नव्हता तर महिलांच्या एकतेचा, आत्मविश्वासाचा आणि सन्मानाचा उत्सव होता. ह्या कार्यक्रमाकरिता प्रमुख मान्यवर म्हणून केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक रायगड भूषण राजू मुंबईकर, राणी मुंबईकर कार्यक्रमाचे सादरकर्ते सूत्रसंचालक संदेशजी घरत, किशोरी घरत, वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र पाटील उपस्थित होते.

## पनवेल शहर वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा नवी मुंबई पोलीस आयुक्तांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात संशयास्पद हालचाली आढळून आल्याने वाहतूक पोलिसांनी केलेल्या एका कारची तपासणी केली असता त्यात बेकायदेशीर पिस्तूल आढळून आले. हे पिस्तूल त्यांनी जप्त केले तसेच दुसऱ्या कारवाईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे केलेल्या वाहन तपासणीत एका दुचाकीच्या डिकीतून गांजा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



या कारवाईत पनवेल वाहतूक शाखेचे व.पो.नि. औदुंबर पाटील, पीएसआय जीवन शेरखाने, पो.ह. आमिर मुलाणी, युवराज येळे, पो.ना. राकेश राजपूत, पो.काँ. महेंद्र बुट्टे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. याबद्दल नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

## आगरी शिक्षण संस्थेचे पथक लेझीम स्पर्धेत प्रथम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकाच्या वतीने चित्ररथ आणि लेझीम पथक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खांदा कॉलनी येथील आगरी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयास लेझीम पथकासाठी प्रथम क्रमांक मिळाला.

या लेझीम पथकाची तयारी करून घेण्यासाठी सुजाता चव्हाण व क्रीडा शिक्षक योगेश बैकर यांनी मेहनत घेतली होती होती. कार्यक्रमासाठी आगरी शिक्षण संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला.

या सर्व शिक्षकांचे आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे आगरी शिक्षण संस्थेच्या शाळा समिती अध्यक्ष श्रुती म्हात्रे व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक पंकज भगत यांनी अभिनंदन केले.



# खालापुरात चोरीच्या दागिन्यांचा छडा

## हस्तगत मुद्देमाल मालकांना सुपूर्द



**चौक : प्रतिनिधी**

रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार आणि त्यांच्या पथकाने जबरी चोरीचा तपास त्वरीत करून चोरी झालेले दागिने पुन्हा मूळ मालक यांना परत दिल्याने खालापूर पोलीस आणि पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे विशेष कौतुक होत आहे.

खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०९/२०२४ याची नोंद BNS u/s ३०९(४) या कलमानुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. या जबरी चोरीच्या गुन्ह्यात चार लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी झाली होती. दुसरा गुन्हा १९(२०२५) या दागिने चोरीच्या गुन्ह्यांची नोंद BNS u/s १०३(१) या कलमानुसार गुन्ह्याची नोंद झाली होती. पहिल्या गुन्ह्यात चार लाख रुपयांची सोन्याची गंठण तर दुसऱ्या गुन्ह्यात एकतीस हजार रुपये किमतीचे दागिने चोरीस गेले होते.

या गुन्ह्याचा तपास अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे व उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून गुन्हेगार यांच्या मुसक्या आवळल्या.दागिन्यांची एकूण किंमत चार लाख एकतीस हजार एवढी असून न्यायालयाच्या आदेशानुसार सोन्याचे दागिने जयश्री खंडू मालकर (रा. चौक ता. खालापूर), विठाबाई.बाळू चव्हाण (ता. खालापूर) यांना परत देण्यात आल्याने दागिने मालकांना विश्वास बसला नाही, त्यांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले.

# पालीतील दरोड्याचा यशस्वी तपास

## २.८७ लाखांचा मुद्देमाल फिर्यादींना केला परत



**पाली : प्रतिनिधी**

काही महिन्यांपूर्वी हातोंड ग्रामपंचायत हद्दीत झालेल्या जबरी दरोड्याच्या गुन्ह्यात पाली–रायगड पोलिसांनी जाबाज कामगिरी करीत महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. पाली पोलीस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल मा. न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादींना परत केला आहे.

या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या तपास कौशल्याचे कौतुक होत आहे. या दरोड्याने हातोंड गोंदावंसह सुधागडात मोठी दहशत निर्माण केली होती, दरोडेखोर आरोपिंच्या मुसक्या लवकरात लवकर आवळून त्यांना धडा शिकवावी, अशी मागणी होत होती, अखेर पाली पोलिसांना या कामी यश आले आहे.

गुन्हा क्र. I CR NO. ७९/२०२५ BNS कलम ३१०(२), ३११, ३०९(४), १२७(२), १११ सह आर्म ॲक्ट ४, २५ अन्वये दाखल गुन्ह्यात आरोपींच्या ताब्यातून ३७,००० किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले होते. या गुन्ह्यातील फिर्यादी संभाजी दामा वाघमारे (रा. हातोंड, ता. सुधागड) यांना हा मुद्देमाल परत करण्यात आला.

गुन्हा क्र. I CR NO. ०३/२०२५ BNS कलम ११८(४), ३१८(२), ३, ५ अन्वये दाखल गुन्ह्यात २,५०,००० किंमतीची सोन्याची चैन जप्त करण्यात आली होती. या प्रकरणातील फिर्यादी अनंत दत्तात्रेय जाधव (रा. धोंडसे, ता. सुधागड) यांना मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सोन्याची चैन परत देण्यात आली.

या जबरी दरोड्याचा पर्दाफाश करण्यात आला असून २.८७ लाखांचा मुद्देमाल पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर व टीममार्फत फिर्यादीना परत करण्यात आला. दोन्ही प्रकरणांतील मुद्देमाल दोन पंचांसमक्ष ई–साक्ष प्रक्रियेद्वारे एकूण २,८७,००० किंमतीचा फिर्यादींना सुपूर्द करण्यात आला.

काही महिन्यांपूर्वी हातोंड ग्रामपंचायत हद्दीत घडलेल्या जबरी दरोड्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांच्या वेगवान तपासामुळे आरोपींना अटक करून मुद्देमाल जप्त करण्यात यश आले. या कारवाईमुळे पाली परिसरात कायद्याचा धाक पुन्हा अधोरेखित झाला असून नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे स्वागत केले आहे.

# खंडोबा मंदिरातील चोरीप्रकरणी आरोपीला शिक्षा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

थेरोंडा गावातील खंडोबा मंदिरफोडी प्रकरणात २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग न्यायालय यांनी आरोपीस दोषी ठरवत शिक्षा ठोठावली असून महेश नंदकुमार चायनाखवा (वय ३८, रा. थेरोंडा, आगल्याची वाडी, अलिबाग) यास भारतीय दंड विधान कलम ३८० व ४५७ अन्वये प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी २,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

आरोपीने थेरोंडा गावातील पाच पाढे कोळी समाजाच्या खंडोबा मंदिराचे दरवाजे उघडून मंदिरात प्रवेश करत लाकडी देव्हाऱ्यातील तीन मोठ्या चांदीच्या मूर्तींचे टाक, सहा लहान चांदीच्या मूर्तींचे टाक व एक चांदीचा लोलक असा ९४,८०० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला होता, तसेच आगल्याची वाडी येथील मुंबईकर कुटुंब व ढोलके कुटुंबीयांच्या कुलदेवतांच्या रूमची कडी तोडून चार चांदीचे मूर्तींचे टाक, एकवीरा देवीचा चांदीचा मुखवटा व चांदीचा लोलक असा अनुक्रमे ३७,८०० रुपये व २८,२०० रुपये किमतीचा ऐवज चोरी करून नेला होता, ज्यामुळे एकूण १,६०,८०० रुपये किमतीचा मुद्देमाल धार्मिक स्थळांमधून चोरीस गेला होता.

रेवदंडा पोलिसांनी तपास करत संपूर्ण १,६०,८०० रुपये किमतीचा चांदीचा मुद्देमाल जप्त करून तो फिर्यादी गोरक्षनाथ लक्ष्मण नवरीकर (रा. थेरोंडा, खंडेराव पाडा) यांना परत केला.

# मुरूड नगरपालिकेकडून समुद्रकिनारा स्वच्छता अभियान

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेकडून समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. शीख धर्माचे नववे गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्ताने मुरूड समुद्रकिनारी ही स्वच्छता मोहीम मुरूड नगर परिषदेकडून राबवण्यात आली होती.





मुरूड समुद्रकिनारी असंख्य पर्यटक येत असतात.अश्यावेळी ते पाण्याच्या प्लास्टिक बॉटल, काचेच्या बॉटल, भोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्रावळ्या, हे समुद्र किनारी टाकून जात असतात. समुद्रकिनारा स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी नगराध्यक्ष आराधना दांडेकर व मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आज एकदरा पुल ते परेश हॉटेल समुद्र किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत असंख्य नगर परिषद कर्मचारी वृंद सहभागी झाले होते.

मुरूड एकदरा पुलापासून स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात कचरा एकत्र करण्यात आला. त्याच प्रमाणे जिथे नाले तुंबले होते तिथे जेसीबीच्या साह्याने साचलेली घाण मोकळी करण्यात आली. एकदरा पुल ते परेश हॉटेलपर्यंत प्लास्टिक बॉटल, नारळाच्या झाडाची झाप, झाडी झुडपे व असंख्य कचरा मोठ्या प्रमाणात एकत्र करून त्याची योग्य ती विल्हेवाट तेलवडे येथील डम्पिंग ग्राउंड येथे करण्यात आली.

# ‘ज्येष्ठ नागरिकांची नियमित आरोग्य तपासणी आवश्यक’

**रोहा : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक मंडळ रोहा व डॉ. आशिता नांदगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने रोहयातील ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये २४ फेब्रु. २०२६ रोजी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याची या वयात तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष पी. बी. सरफळे यांनी सांगितले.



यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष गायकवाड, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, प्रसिद्ध प्रमुख अरुण करंबे, सुरेश मेहता, नंदकुमार भादेकर, मंगेश जोशी, शरद गुडेकर, दत्ताराम तवटे, धनपाल तिरवे, अनुराधा धुमाळ यासह मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

या शिबिरात सुमारे १०० ज्येष्ठ नागरिकांच्या संधी वात, सांधेदुखी, शुगर, कॅशियम मणके, हाडे, स्नायु यांची तपासणी औषध उपचार व मार्गदर्शन डॉ. आशिता नांदगावकर, डॉ. गजेंद्र शिलीमकर, डॉ. शेखर घोडके यांनी तपासणी केली. सुरुवातीला ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष पी. बी. सरफळे यांच्या अध्यक्षतेखाली नेहमीप्रमाणे कामकाजची मासिक सभा झाली.

सभेपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व जिल्हापरिषदेचे मा. उपाध्यक्ष स्व. भाईसाहेब पाशीलकर यांच्या निधनाबद्दल तिव्र शोक व्यक्त करून दोन मिनिटे उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर शिबिरातील डॉक्टर त्यांची टीम व ज्येष्ठ नागरिक यांचे सचिव सुरेश मोरे व प्रकाश पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# माझी वसुंधरा अभियानात वडगाव ग्रामपंचायत प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत वडगावच्या प्रशासनाने लोकनियुक्त प्रतिनिधी नसतानादेखील तेथील ग्राम पंचायत अधिकारी सुहास वारे यांनी ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन उत्कृष्ट काम केल्याने माझी वसुंधरा अभियान ५.० हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रथम क्रमांकाने पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते स्वीकारला.महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत हे उपस्थित होते.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत पाच ते दहा हजार लोकसंख्या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये वडगाव ग्रामपंचायतीचा राज्यात प्रथम क्रमांक आला. विशेष म्हणजे येथे लोकनियुक्त सदस्य नाहीत, ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे व ग्रामपंचायत प्रशासक विनोद चांदोरकर यांनी ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

केलेल्या या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने हा पुरस्कार देण्यात आला. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व ग्रामस्थ, कर्मचारी संबंधित कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतल्याने हा पुरस्कार प्राप्त झाला, असे ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांनी सांगितले.



**अलिबाग : कमलेश्वर मंदिर जीर्णोद्धार कार्यक्रमात भाजप नेते आस्वाद पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**




**खोपोली : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना पुण्यतिथीनिमित्त खोपोली भाजपतर्फे अभिवादन करण्यात आले. शहर मध्यवर्ती कार्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून शक्ती केंद्रप्रमुख, भूथ अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. यावेळी शहराध्यक्ष अजय इंगुलकर, नगरसेवक किशोर पाटील, युवा कार्यकर्ते विनायक माडपे, विकास नाईक अपर्णा साठे, विभावरी पाठक, हिंमतराव मोरे, नाना मोरे, सीमा मोगरे, विमल गुप्ते, हेमंत भाटिया, ऋषिकेश म्हात्रे, सतीश शहा इत्यादी उपस्थित होते.**

## नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग :** बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. अधिकारी व कर्मचारी यांनी बुधवारी (दि.२५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३०७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी तीन लाख २२ हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender,

| RFx No. | Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000038994 | EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Tender no. 02 | Hiring of vehicle (e.g. Mahindra TUV/SUMO or similar Type) services along with fuel and driver for Maintenance/Testing Unit under 400kV R.S (O&M) Division, Kharghar for the year 2026-27. | Rs. 5,98,846 (Including all taxes) | Rs. 5984.46 | Rs. 590/- (incl. GST) |

**Sale period:** 26.02.2026 to 12.03.2026, **Last Date of Submission:** 12.03.2026 up to 23:59 Hrs,
**Date of opening (Tech. bid):** 13.03.2026 at 10:30 Hrs(if possible).
**Contact person:** Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar. (Contact No-9167006557).
For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV RS O&M Dn., Kharghar**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मूळ जमिन मालका सौ. बाळूबाई महादेव कोळी यांच्या मालकी हक्कातील मौजे जसखार, ता. उरण जि रायगड येथील जमिन मिळकती हया मेट्रो सेंटर उरण यांनी न्हावा शेवा बंदर या प्रकल्पाकरीता संपादीत करुन त्या मोबदल्यापोटी त्यांच्या लाभांत में. सिडकोच्या १२.३० टक्के योजनेअंतर्गत एकत्रिकरणामध्ये इरादित करण्यात आलेला ३३० चौ. मी. क्षेत्राचा भूखंड हा सौ. बाळूबाई महादेव कोळी यांच्याकडून आणि त्याच्या मुलांच्या संमतीने में, सिडकोमार्फत भूखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी प्राप्त करून हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भूखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | सिडको संचिका क | ब्लॉक नं. | भुखंड क. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| जे.एन.पी.टी. नोड, ता.उरण, जि. रायगड | १९३ | ११ | १० | ७ | २६९६ चौ.मी. पैकी ३५० चौ.मी. |

तरीही वर उल्लेखित ३५० चौ. मी. क्षेत्राच्या भूखंडांचे आमच्या अशिलांच्या लाभात हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पूर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भूखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी च कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाहीं असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भूखंडावर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचा भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भूखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करून सदरहू भूखंड हा हस्तांतरीत करुन घेतील याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**
**पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबर्स,**
**प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी.**
**बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि, ठाणे**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-2/26-27 **RFX 7000038986** | Hiring of vehicle (LMV) for Hot Line Unit Kharghar under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 26-27 (LMV type Ertiga / Mahindra TUV/SUMO etc.) **Tender Fee Rs. 500/- + GST** | **Limited to Rs. 6.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 25.02.2026 at 18:00 Hrs. to 11.03.2026 up to 10:59 hrs, Opening date :- 11.03.2026 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website
**https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm) Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**TENDER NOTICE**

School & College Office, Ladies Teacher's Room, Principal Office, Computer Lab, Store Room & Working Office

Breaking Old Plaster Inside & Outside, New Plaster Inside & Outside, Door Frame & Doors, Window & Window Frames Sliding, Still Grills, Reparing All Electrical Work & Electric Equipments, Safety Doors, All Furniture Work Repair & New, Steel Work, All Interior Decorate Work, Plumbig Work

Approximately 55 Lakh

Submit-7 Days

**Address -** Shree Ganesh Vidyamandir & Jr. College Chembur, Mumbai

DNC Public School Gopalwadi, Osmanabad

After The Work The Statement Should Be Submited

**सही/–** **कार्यकारी विश्वस्त** | **सही/–** **विश्वस्त**
**श्री गणेश एज्युकेशन ट्रस्ट**

# सहयजमान श्रीलंकेचे आव्हान संपुष्टात

## न्यूझीलंडचा ६१ धावांनी दणदणीत विजय

**कोलंबो : वृत्तसंस्था**

सँटेनर-कोलची सातव्या गड्यासाठी ८४ धावांची भागीदारी व रचिन रवींद्रच्या (४/२७) कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरीच्या बळावर न्यूझीलंडने यजमान श्रीलंकेचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. याचबरोबर सहयजमान लंकेचे आव्हान संपुष्टात आले. या लढतीत न्यूझीलंडची एकवेळ पाच बाद ८४ अशी दाणादाण उडाली होती, पण सँटेनर-कोलच्या ८४ धावांच्या भागीदारीमुळे न्यूझीलंडने सात बाद १६८ धावा केल्या. प्रत्युत्तरात लंकेला २० षटकांत आठ बाद १०७ धावांवर समाधान मानावे लागले.

विजयासाठी १६९ धावांचे आव्हान असताना लंकेच्या केवळ चारच फलंदाजांना दुहेरी धावसंख्या गाठता आली. कमिंदू मेंडिसने सर्वाधिक ३१, तर दुनिथने २९ धावा केल्या. अन्य फलंदाज मात्र शरणागती पत्करत गेले आणि २० षटकांत केवळ आठ बाद १०७ धावा करता आल्याने अंतिमत: लंकेचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.



किवीज संघातर्फे रचिन रवींद्रने २७ धावांत चार बळी घेतले. या विजयासह न्यूझीलंडसाठी उपांत्य फेरीत पोहचण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

प्रारंभी मिशेल सँटेनर व कोल मॅककॉन्की यांनी सातव्या गड्यासाठी ८४ धावांची दणकेबाज भागीदारी साकारल्यानंतर न्यूझीलंडने २० षटकांत सात बाद १६८ धावांपर्यंत मजल मारली. टी-२० विश्वचषकातील या चुरशीच्या लढतीत मधल्या फळीतील फलंदाजांच्या सुमार कामगिरीमुळे किवीज संघ एकवेळ ६ बाद ८४ असा अडचणीत सापडला होता, मात्र त्यानंतर कर्णधार मिचेल सँटेनर आणि कोल मॅककॉन्की यांची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली.

या सामन्यात न्यूझीलंडची अवस्था एकवेळ २ बाद ७५ अशी भक्कम होती, मात्र श्रीलंकेच्या प्रभावी माऱ्यासमोर अचानक किवींच्या फलंदाजीला भगदाड पडले आणि अवघ्या नऊ धावांत चार गडी गमावून हा संघ सहा बाद ८४ असा अडचणीत सापडला होता. श्रीलंकेच्या महेश तीक्षणाने ३० धावांत तीन बळी घेत न्यूझीलंडचे कंबरडे मोडले.

**पाकिस्तानलाही झटका**

न्यूझीलंडच्या विजयासह पाकिस्तानच्या सेमी फायनलचा प्रवास अधिक खडतर झाला आहे. पाकिस्तानचा संघ २८ फेब्रुवारीला श्रीलंकेविरुद्ध सुपर-८ फेरतील आपला अखेरचा सामना खेळणार आहे, पण त्याआधी २७ फेब्रुवारीला न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात सामना रंगणार आहे. हा सामना न्यूझीलंडने जिंकला तर पाकिस्तानचा संघ मैदानात उतरण्याआधी स्पर्धेतून बाद होईल. श्रीलंकेविरुद्ध चांगल्या धावगतीने विजय मिळवला हीदेखील न्यूझीलंडसाठी जमेची बाजू ठरेल. त्यामुळेच पाकिस्तानचा संघ अजूनही सेमीच्या शर्यतीत असला तरी त्यांचे आव्हान जवळपास संपल्यात जमा आहे. एखादा चमत्कारच त्यांना वाचवू शकतो.

### वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

## साखळीतील सलग दुसऱ्या विजयाने महाराष्ट्राचा बाद फेरीतील प्रवेश निश्चित

**बडोदा : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने ७२व्या वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळच्या सत्रात दुसऱ्या विजयाची नोंद केली. गुजरात बडोदा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील ड गटात महाराष्ट्राने कर्नाटकचा प्रतिकार ४९-२५ असा मोडून काढला. महाराष्ट्राची गटातील शेवटची साखळी लढत त्रिपुरा संघाशी होईल.

आक्रमक सुरुवात करीत महाराष्ट्राने पूर्वार्धात २४-१३ अशी आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. उत्तरार्धात तोच जोश कायम ठेवत आपला विजय साकारला. महाराष्ट्राच्या अस्लम इनामदार यांनी चौफेर चढाया करीत कर्नाटकचा बचाव खिळखिळा करून टाकला. त्याला चढाईत आदित्य शिंदे,



शिवम पठारे यांची, तर संकेत सावंत, दादासो पुजारी, जयेश महाजन यांनी पकडीची मोलाची साथ लाभली.

रात्री उशिरा झालेल्या पहिल्या ड गटातील सामन्यात महाराष्ट्राने दिल्लीचे आव्हान ५०-३७ असे परतवून लावले. दोन्ही संघानी एकमेकांचा अंदाज घेत खेळ केल्याने मध्यंतरापर्यंत सामना अत्यंत चुरशीने खेळला गेला. विश्रांतीला २४-२२ अशी अवघ्या दोन गुणांची आघाडी महाराष्ट्र संघाकडे होती. विश्रांतीनंतर मात्र महाराष्ट्राने टॉप गिअर टाकत गुणांचे अर्धशतक गाठले. दुसऱ्या डावात महाराष्ट्राने २६ गुण, तर दिल्लीने अवघ्या १५ गुणांची कमाई केली. महाराष्ट्राने १३ गुणांनी बाजी मारली. आदित्य शिंदे, अस्लम इनामदार, अजित चौहान यांच्या झंझावाती चढायांना दादासो पुजारी, संकेत सावंत, जयेश महाजन यांची मिळालेली बचावाची साथ यामुळे हा विजय शक्य झाला.

## महाडमध्ये रविवारी हाफ मॅरेथॉन

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील कंपनी बिर्ला ओपसतर्फे महाड येथे सलग दुसऱ्या वर्षी हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १) आयोजित करण्यात आले आहे. ही स्पर्धा महाड शहरातील काकरतळे येथील रावसाहेब भिलारे मैदान येथून पहाटे ५ वाजता सुरू होणार आहे.



स्पर्धेत २१.१ किमीची हाफ मॅरेथॉन, १० किमीची असलेली युथ रन, ५ किमीची ड्रीम रन, ३ किमीसाठी फक्त फन रन असणार आहे. या स्पर्धेसाठी एकूण पाच लाख १० हजार रुपयांची पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

या स्पर्धेत तंदुरुस्ती क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व मिलिंद सोमण आणि धावपटू सुफिया सुफी विशेष उपस्थित राहणार असून ते स्वतःही स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यासोबतच अन्य दहा ते पंधरा स्थानिक तसेच बाहेरील फिटनेसतज्ज्ञ व मॅरेथॉन रनर सर्व गटांना मार्गदर्शन करणार आहेत.

स्पर्धा केवळ धावण्याची शर्यत नसून आरोग्य एकात्मता आणि उत्साहाचा मोठा उत्सव ठरणार आहे. २१.१ किलोमीटरच्या निसर्गरम्य मार्गावर धावताना सहभागी स्पर्धकांना महाडचा ऐतिहासिक वारसा, निसर्ग आणि शांततामय परिसराचा अनुभव घेता येणार आहे.

या उपक्रमाबाबत कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुमार यांनी सांगितले की, उद्योग उभारणीबरोबरच समाजाच्या प्रगतीत हातभार लावणे ही कंपनीची जबाबदारी आहे. अर्ध मॅरेथॉनमुळे निरोगी जीवनशैली आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होईल. स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अर्जुन-सानियाचे प्री-वेडिंग सेलिब्रेशन

**जामनगर : वृत्तसंस्था**

क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन लवकरच लग्नाच्या बेडीत अडकणार आहे. वृत्तानुसार तो ५ मार्च रोजी एका प्रसिद्ध उद्योगपतीची मुलगी सानिया चंडोक लग्न करणार आहे. लग्नापूर्वी संपूर्ण तेंडुलकर कुटुंब लग्नापूर्वीच्या समारंभासाठी जामनगरला गेले होते, जिथे नीता अंबानी यांनी खास भाषण दिले.



मुंबई इंडियन्सने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये जामनगरमधील संपूर्ण तेंडुलकर आणि अंबानी कुटुंबे दिसत आहेत. लग्नापूर्वीच्या समारंभासाठी जमलेल्या सर्व पाहुण्यांशी नीता अंबानी यांनी संवाद साधला.

## पंच बकनर यांचा २२ वर्षांनंतर माफीनामा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या इतिहासात काही निर्णय असे असतात, जे वर्षानुवर्षे चाहत्यांच्या मनात कायम राहतात. भारताचा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकर आणि वेस्ट इंडिजचे माजी पंच स्टीव्ह बकनर यांच्याशी संबंधित २००३-०४मधील एक प्रसंग आजही चर्चेत आहे. तब्बल २२ वर्षांनंतर आता बकनर यांनी त्या वादग्रस्त निर्णयाबद्दल खंत व्यक्त केली आहे.

ब्रिस्बेन येथे झालेल्या भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यात हा प्रसंग घडला होता. त्या वेळी आपल्या कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असलेला सचिन फलंदाजी करत होता. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज जेसन गिलेस्पीने टाकलेला चेंडू सचिनच्या पॅडला लागला आणि ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी जोरदार अपील केले. अनुभवी पंच असलेल्या बकनर यांनी क्षणाचाही विलंब न करता बोट वर केलं. सचिन अवघ्या तीन धावांवर बाद झाला आणि



भारतीय चाहत्यांना मोठा धक्का बसला. नंतरच्या रिप्लेमध्ये स्पष्ट दिसत होते की चेंडू स्टम्पच्या वरून जात होता. त्या वेळी समालोचक टोनी ग्रेग यांनीही थेट प्रक्षेपणात हा निर्णय भयानक असल्याचे म्हटले होते. मैदानावर सचिनच्या चेहऱ्यावरचे भाव चाहत्यांना अजूनही आठवतात.

आता ७९ वर्षीय बकनर यांनी एका मुलाखतीत कबूल केले की, तो निर्णय चुकीचा होता. सचिन तेंडुलकरला एल्बीडब्ल्यू देणे चूक होती. लोक आजही त्याबद्दल बोलतात. आयुष्यात चुका होतात. मी ती चूक मान्य केली आहे, असे त्यांनी सांगितले. त्या काळात 'डीआरएस' तंत्र अस्तित्वात नव्हते. त्यामुळे पंचांचा निर्णय अंतिम मानला जायचा. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात असा निर्णय झाला नसता, पण त्या काळात सचिन आऊट झाला आणि तो प्रसंग भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या मनात कायमचा कोरला गेला.

स्टिव्ह बकनर हे त्यांच्या काळातील अत्यंत अनुभवी पंच मानले जात होते. त्यांनी १२०हून अधिक कसोटी सामने आणि अनेक विश्वचषक स्पर्धांमध्ये पंचाच काम केले आहे. तरीही सचिनविरुद्ध दिलेल्या काही निर्णयांमुळे ते भारतीय चाहत्यांच्या टीकेचे धनी ठरले होते. २२ वर्षांनंतर त्यांनी दिलेली कबुली अनेकांसाठी उशिरा का होईना, पण समाधान देणारी आहे. क्रिकेटमध्ये चुका होतात, मात्र त्या स्वीकारण्याचे धैर्य फार थोड्यांकडे असते. बकनर यांच्या या विधानामुळे क्रिकेटच्या इतिहासातील एक वादग्रस्त अध्याय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## ...तर कोलकाता, अहमदाबादच्या चाहत्यांना मिळणार रिफंड

**मुंबई : वृत्तसंस्था**

आगामी टी-२० विश्वचषकाच्या बाद फेरीतील सामन्यांच्या स्थळांबाबत आयोजकांनी महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले आहे. पाकिस्तानचा संघ उपांत्य किंवा अंतिम फेरीत पोहचल्यास सामन्यांच्या नियोजित स्थळांमध्ये बदल करण्यात येणार असून अशा परिस्थितीत तिकीट खरेदी करणाऱ्या चाहत्यांना पूर्ण परतावा दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.

स्पर्धेतील पहिली उपांत्य फेरी फ्लोटिंग व्हेन्यू तत्त्वावर आधारित असेल. हा सामना कोलकात्याचे ईडन गार्डन्स किंवा कोलंबोचे आर. प्रेमदासा स्टेडियम यांपैकी एका ठिकाणी खेळवला जाईल. दुसरीकडे दुसरी उपांत्य फेरी मुंबईच्या वानखेडेवर निश्चित करण्यात आली आहे.

जर पाकिस्तानचा संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला, तर त्यांचा सामना ४ मार्च रोजी कोलंबोमध्ये होईल. जर पाकिस्तान बाद फेरीत पोहचू शकला नाही, मात्र श्रीलंका पात्र ठरली आणि त्यांचा सामना भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही संघाशी असेल, तर ही पहिली उपांत्य फेरी कोलंबोमध्येच खेळवली जाईल. याउलट वरील दोन्ही परिस्थिती उद्भवल्या नाहीत किंवा भारत आणि श्रीलंका यांच्यात सामना होणार असेल, तर पहिली उपांत्य फेरी ४ मार्चला कोलकात्यात होईल.

नियोजित वेळापत्रकानुसार अंतिम सामना अहमदाबादमध्ये होणार आहे, मात्र पाकिस्तानने अंतिम फेरीत धडक मारल्यास हा सामना अहमदाबादऐवजी कोलंबोला हलवण्यात येईल.

## खेळाडूंच्या उत्कर्षात क्रीडा पत्रकारांचा मोठा वाटा -माजी कसोटीपटू प्रवीण आमरे

### मुंबई मराठी पत्रकार संघाच्या करमरकर क्रिकेट टर्फचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

एखादा खेळाडू घडतो, पुढे जातो त्याला त्याच्या कुटुंबांबरोबर खूप लोकांचा हातभार लागतो. आज क्रिकेटपटूंबरोबर देशातील विविध खेळांत उच्च स्थानी असलेल्या सर्व खेळाडूंच्या यशात क्रीडा पत्रकारांचा खूप मोठा आहे. त्यात मीसुद्धा येतो. माझ्या सुरुवातीच्या काळापासून मला सर्व क्रीडा पत्रकारांनी मदत केली. माझी कामगिरी सर्वदूर पोहचवण्यासाठी हात दिला. म्हणूनच एका सर्वसामान्य घरातील माझ्यासारखा खेळाडू उच्च स्थानी जाऊ शकला, असे प्रांजळ मनोगत भारताचा माजी कसोटीपटू प्रवीण आमरे याने व्यक्त केले.

मुंबई मराठी पत्रकार संघाने आझाद मैदान येथील पत्रकार भवनाच्या आवारात उभारलेल्या क्रीडा पत्रकारमहर्षी वि.वि. करमरकर क्रिकेट टर्फचे उद्घाटन आमरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी क्रीडा पत्रकारांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली.







या कार्यक्रमास मुंबई क्रिकेट असोसिएशनचे चिटणीस उन्मेष खानविलकर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, मैदान बचाव चळवळीचे अग्रणी ज्येष्ठ क्रीडा संघटक भास्कर सावंत, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले, अजय वैद्य उपस्थित होते.

दूरचित्रवाणी, सोशल मीडियाचा महापूर नव्हता त्या काळात आमच्यासारख्या असंख्य खेळाडूंना प्रिंटच्या क्रीडा पत्रकारांनी मोलाची साथ दिली. त्यांनी आमच्यावर लिहिलेल्या बातम्या, माहिती, लेख सर्वदूर पोहचवले. यामुळे गरीब घरातून आलेले, पण अतिशय उच्च गुणवत्ता असलेल्या माझ्यासारख्या अनेक खेळाडूंना मदत झाली. त्यांना उत्तम नोकऱ्या मिळाल्या, विविध आस्थापनांवर काम करता आले. मुख्य म्हणजे खेळाडूंना आयुष्यात स्थिरस्थावर होण्यासाठी मोलाची मदत झाली. ही मदत मी आयुष्यभर विसरणार नाही. यामुळे क्रीडा पत्रकारांनी बोलावलेल्या कार्यक्रमांना मी आवर्जून जातो. तो मला माझ्या घरचा सोहळा वाटतो, असे सांगत आमरे यांनी आपल्या भावनांचा एक पट उलगडला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उन्मेष खानविलकर यांनी क्रिकेट टर्फसाठी लागणाऱ्या बोलिंग मशीन देण्याचे आश्वासन दिले. क्रीडा पत्रकार हे नेहमीच संघटना, खेळाडूंच्या पाठीशी उभे असतात. आता त्यांच्या स्वास्थ्यासाठी मदत करण्याची आमची जबाबदारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले, तर करमरकर ट्रस्टचे ट्रस्टी असणाऱ्या भास्कर सावंत यांनी करमरकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी टर्फच्या कामासाठी ११ हजार रुपयांचा धनादेश दिला.


करमरकरांसारख्या मित्राची जागा माझ्या हृदयात मी जपून ठेवलीय. क्रीडा पत्रकारितेला नवा आयाम देणाऱ्या या महर्षीची आठवण पत्रकार संघाने जपली हे फार मोठे काम आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. हे क्रिकेट टर्फ पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आले असल्याची घोषणा अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी केली, तर अनेक उपक्रम यापुढेही सुरू राहतील, असे कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी सांगितले. कार्यक्रमाचे निवेदन ज्येष्ठ पत्रकार संजय परब यांनी केले.

## शिखर धवनला मोठा दिलासा

### माजी पत्नीकडून ५.७२ कोटी रुपये मिळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी फलंदाज शिखर धवन याला त्याची माजी ऑस्ट्रेलियन पत्नी आएशा मुखर्जीविरुद्ध सुरू असलेल्या खटल्यात मोठा कायदेशीर दिलासा मिळाला. दिल्लीच्या कौटुंबिक न्यायालयाने ५.७२ कोटी रुपये शिखरला परत करावेत, असे आदेश मुखर्जीला दिले आहेत. हे जोडपे २०२३ साली मानसिक छळाच्या कारणाने विभक्त झाले होते.



२१ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील खासगी समारंभात शिखरने मैत्रीण सोफी शाईन हिच्याशी विवाह केला. २५ फेब्रुवारी रोजी कौटुंबिक न्यायालयाने मुखर्जीविरुद्ध आदेश दिले. मुखर्जी हिने मालमत्तेच्या सेटलमेंटसाठी ऑस्ट्रेलियातील न्यायालयात अर्ज केला होता. कायद्यानुसार वैवाहिक मालमत्ता पती-पत्नीमध्ये विभागली जाण्याची तरतूद असली, तरी धवनला मोठी रक्कम हस्तांतरित करण्यास सांगण्यात आले होते, मात्र कौटुंबिक न्यायालयात या निर्णयाला आव्हान देत तो टिकाऊ नसल्याचे नमूद केले आणि परिणामी मुखर्जी हिला ती रक्कम धवनला परत करण्याचे निर्देश दिले.


विवाह विशिष्ट भारतात हिंदू अधिनियमांतर्गत अशा मालमत्ता किंवा निधी हस्तांतरणाची थेट तरतूद नाही. त्यामुळे दिल्ली न्यायालयाने हा निर्णय अस्थिर ठरवत, मुखर्जी हिला रक्कम परत करण्याचे आदेश दिले आहेत.

'माझ्या लग्नाबद्दल मला शुभेच्छा देणार नाहीस का?' हे ट्विट व्हायरल होताच धवनने ते असंवेदनशील आणि खोटे असल्याचे स्पष्ट केले. शांतपणे प्रतिक्रिया देताना तो म्हणाला, मैदानावर असो किंवा मैदानाबाहेर. सकारात्मक शक्तीवर माझा ठाम विश्वास आहे. भूतकाळाचा मी आदर करतो. कृपया माझे नाव असंवेदनशील आणि खोट्या विधानांशी जोडू नका. धन्यवाद!

## पराभवानंतर श्रीलंकेचा कर्णधार दासून शनकाने व्यक्त केल्या भावना

**कोलंबो : वृत्तसंस्था**

इतक्या मोठ्या प्रमाणात आम्हाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या चाहत्यांसमोर असा पराभव होणे लाजिरवाणे आहे. आम्ही चांगली सुरुवात केली, पण मिचेल सँटनर आणि कोल मॅकहोनी यांच्या भागीदारीमुळे न्यूझीलंडने आव्हानात्मक धावसंख्या उभारली. आमच्यापासून विजय तिथे दुरावला, अशा शब्दांत श्रीलंकेचा कर्णधार दासून शनकाने पराभवानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या.



टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत सुपर-८ गटाच्या लढतीत न्यूझीलंडविरुद्ध पराभवामुळे श्रीलंकेचे आव्हान संपुष्टात आले आहे. नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याच्या निर्णयाबाबत शनका म्हणाला, टॉस जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय सगळ्यांनी चर्चा करून घेतला होता. खेळपट्टी फिरकीला एवढी साथ देईल असे आम्हाला वाटले नव्हते, कारण ही नवी खेळपट्टी आहे. न्यूझीलंडला १३०पर्यंत रोखायचे होते, पण त्यांनी धावसंख्या दीडशेपल्याड नेली. ते चांगले खेळले.

## कर्णधार सलमान अलीच्या पत्नीने पाकिस्तानी ट्रोलर्सना सुनावले

**कराची : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक सामन्यातील सुपर ८ फेरीत इंग्लंडबरोबर झालेल्या लढतीत पाकिस्तानचा पराभव झाला. या पराभवामुळे पाकिस्तानचा उपांत्य फेरीत जाण्याचा मार्ग कठीण झाला आहे. पाकिस्तानच्या पराभवानंतर नेटकऱ्यांनी कर्णधार सलमान अली आघा याच्यासह त्याच्या कुटुंबीयांनादेखील ट्रोल केले. यानंतर सलमानची पत्नी सबा मांझरने ट्रोलर्सना सणसणीत उत्तर दिले आहे.



इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर कर्णधार सलमान आगाचे पाकिस्तान चाहत्यांनी ट्रोलिंग केले. सलमानसह त्याच्या कुटुंबियांनाही अनेकांनी लक्ष्य केले. यानंतर संतापलेल्या सलमानची पत्नी सबाने ट्रोलर्सना उत्तर दिले. सबाने इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत ट्रोलर्सना खडसावले. पाकिस्तानी चाहत्यांनो, मला आणि माझ्या मुलाबाबत बरं-वाईट बोलून तुम्हाला विश्वचषक जिंकता येणार नाही, असे सबाने पोस्टमध्ये लिहले आहे. दरम्यान, यानंतर सबाने यानंतर ही स्टोरी डिलिट करुन खाते प्रायव्हेट केले.

पाकिस्तानी कर्णधार सलमान आगाने परभवावर भाष्य करतान त्यांचे प्रयत्न कमी पडल्याचे मान्य केले. दुसरी त्यांने इंग्लिश कप्तान हॅरी ब्रूकचे कौतुक केले. आमच्या फलंदाजीची चांगली सुरुवात झाली पण, शेवट खराब झाला. मला वाटतं हॅरी उत्तम खेळला. आमची धावसंख्या कमी होती. आणि हॅरीने आमच्याकडून विजय हिरावून घेतला, असे सलमान आगा सामन्यानंतर बोलताना म्हणाला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com